www.rajdand.com
सातारा/पुणे, गुरुवार
01.02.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । माघ कृ ११
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीने केली अटक

## जमीन घोटाळा प्रकरणात कारवाई

**नवी दिल्ली :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. आज ईडीने हेमंत सोरेन यांना चौकशीसाठी बोलवलं होतं. त्यांची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. जमीन घोटाळा प्रकरणात आज हेमंत सोरेन यांची चौकशी करण्यात आली. काही तासांच्या चौकशीनंतर हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी काही वेळापूवीच त्यांचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. त्यानंतर हेमंत सोरेन यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे झारखंडमध्ये राजकीय संकट निर्माण झालं आहे. इंडियन एक्स्प्रेसने याविषयीचं वृत्त दिलं आहे.



झारखंडमधील जमीन घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने हेमंत सोरेन यांची चौकशी ईडीकडून करण्यात आली. यानंतर हेमंत सोरेन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी राजभवनात पोहोचले. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदारही रांची येथील राजभवनात पोहोचले. चंपई सोरेन यांनी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केल्याचे सांगण्यात येतं आहे. चंपई सोरेन यांना ४१ हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे. ८० सदस्यीय विधानसभेत बहुमतासाठीची मॅजिक फिगर ४१ आहे.

ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला.

प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं आहे. यानंतर हेमंत सोरेन यांच्या अटकेवरुन काँग्रेस आक्रमक झाल्याचं पाहण्यास मिळतं आहे.

देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने हेमंत सोरेन यांची अटक होण्याची ही घटना महत्त्वाची मानली जाते आहे. देशात पुढच्या काही दिवसांमध्ये लोकसभा निवडणुकीचं बिगूल वाजणार आहे. हेमंत सोरेन यांच्यावर भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तर दुसरीकडे झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसच्या नेत्यांकडून भाजपावर सडकून टीका केली जात आहे. जे मोदींबरोबर नाहीत त्यांना अटक केली जाते आहे किंवा त्यांच्यावर कारवाई होते आहे अशी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली आहे.

### मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं आहे. यानंतर हेमंत सोरेन यांच्या अटकेवरुन काँग्रेस आक्रमक झाल्याचं पाहण्यास मिळतं आहे.

देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने हेमंत सोरेन यांची अटक होण्याची ही घटना महत्त्वाची मानली जाते आहे. देशात पुढच्या काही दिवसांमध्ये लोकसभा निवडणुकीचं बिगूल वाजणार आहे. हेमंत सोरेन यांच्यावर भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तर दुसरीकडे झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसच्या नेत्यांकडून भाजपावर सडकून टीका केली जात आहे. जे मोदींबरोबर नाहीत त्यांना अटक केली जाते आहे किंवा त्यांच्यावर कारवाई होते आहे अशी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली आहे.

सक्तवसुली संचालनालयाने कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी हेमंत सोरेन यांची बुधवारी (३१ जानेवारी) तब्बल ८ तास चौकशी केली. या चौकशीनंतर त्यांना अटकही करण्यात आली आहे. तत्पूवी हेमंत सोरेन यांनी झारखंडच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर सोरेन यांनी त्वरित राजभवन गाठलं आणि राज्यपालांकडे त्यांचा राजीनामा सुपूर्द केला. दरम्यान, ईडीच्या अधिकाऱ्यांनी चौकशी पूर्ण केल्यानंतर ईडीच्या कार्यालयाबाहेर पडलेल्या हेमंत सोरेन यांनी ह्यविक्ट्री साईन (विजयी झाल्याची बोटांनी केलेली प्रतिकात्मक खून) दाखवली आणि ते राजभवनाकडे मार्गस्थ झाले.

झारखंडचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश ठाकूर यांनी हेमंत सोरेन यांच्या राजीनाम्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तर चंपई सोरेन यांची सभागृह नेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. चंपई सोरेन यांचीच मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली आहे. चंपई सोरेन काही वेळापूवी राजभवनात दाखल झाले आहेत. लवकरच त्यांचा शपथविधी पार पडेल, अशी माहिती समोर आली आहे.हेमंत सोरेन यांच्यावरील कारवाईमुळे झारखंडमध्ये राजकीय संकट निर्माण झालं आहे.

## मराठा सर्वेक्षणाबाबत पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हाधिकाऱ्यांची तक्रार

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गजानन खराटे यांनी पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यातील मराठा सर्वेक्षण, खुल्या प्रवर्गातील सुरू असलेल्या सर्वेक्षणाचा आढावा विभागीय आयुक्तालयातून बुधवारी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव या वेळी उपस्थित होते. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त बैठकीला ऑनलाइन उपस्थित होते.




सर्वेक्षणाची माहिती सॉफ्टवेअरच्या डॅशबोर्डवर सायंकाळी साडेसहा वाजता सर्वेक्षणाचे काम संपल्यावर दिसते. त्यामुळे दिवसभरात कोणत्या गावात, भागात किती काम झाले किंवा कसे, याबाबतची रिअल टाइम माहिती दिसत नाही, अशी तक्रार जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्तांनी आयोगाकडे या वेळी केली. रिअल टाइम आकडे दिसल्यास ज्या ठिकाणी काम कमी दिसत असेल, त्याठिकाणी तातडीने उपाययोजना करून कामाला गती देता येईल. यावर पुढील दोन दिवस सर्वेक्षणाचे रिअल टाइम आकडे डॅशबोर्डवर दिसतील, अशी ग्वाही आयोगाकडून या वेळी देण्यात आली.

याबाबत बोलताना विभागीय आयुक्त राव म्हणाले, ह्यपुणे विभागातील पाचही जिल्ह्यातील सर्वेक्षणाचे काम ७८ टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित २२ टक्के काम पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याची शाश्वती पाचही जिल्हाधिकारी यांनी या वेळी दिली. पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमधील काही तालुक्यांत १०० टक्के सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात १०० टक्के सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे, तर शेजारील पंढरपूर तालुक्यात केवळ ३५ टक्के काम झाले आहे. त्यामुळे ज्या गावातील किंवा तालुक्यातील काम १०० टक्के पूर्ण झाले आहे, अशा ठिकाणचे प्रगणक काम कमी झालेल्या ठिकाणी गुरुवारपासून नेमण्यात येणार आहेत. याकरिता मागासवर्ग आयोगाने विशेष परवानगी आयोगाने दिली आहे. प्रगणक गावनिहाय नोंदणी करण्यात आली आहे. त्यामुळे १०० टक्के काम झालेल्या गावातील प्रगणकांची नोंदणी रद्द करून काम कमी झालेल्या गावात नोंदणी करण्यात येणार आहे.

## पुण्यात शाळकरी मुलाला अल्पवयीन मुलांनी भोसकले

**पुणे :** सांगलीत शाळकरी मुलावर कोयत्याने वार केल्याची घटना नुकतीच घडली. पुण्यातील रामोशी गेट परिसरात शाळकरी मुलांनी एकावर चाकूने वार केले. गज, पट्ट्याने त्याला बेदम मारहाण केली. या घटनेत शाळकरी मुलगा गंभीर जखमी झाला असून, खडक पोलिसांनी चार शाळकरी मुलांना ताब्यात घेतले.

याबाबत अल्पवयीन मुलाने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार १५ वषीय अल्पवयीन मुलगा भवानी पेठेतील रामोशी गेट परिसरात असलेल्या महापालिकेच्या शाळेत दहावीत आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेली चार अल्पवयीन मुले याच परिसरातील महापालिकेच्या उर्दू शाळेत दहावीत शिक्षण घेत आहेत. तक्रारदार अल्पवयीन मुलाची एकमेकांकडे पाहण्याच्या वादातून एका मुलाशी दोन दिवसांपूवी भांडणे झाली होती. त्यानंतर अल्पवयीन मुलाने या घटनेची माहिती शाळेतील मित्रांना दिली.

मंगळवारी (३० जानेवारी) दुपारी साडेतीनच्या सुमारास शाळकरी मुलगा रामोशी गेट परिसरातून निघाला होता. त्यावेळी चौघांनी त्याला अडवले. त्याला शिवीगाळ केली. तुझे बहुत मस्ती आयी हैं. दादागिरी करता है क्या ? अशी विचारणा करुन मुलावर चाकूने हल्ला चढविला. शाळकरी मुलाच्या छातीवर चाकूने वार केले. गज, साखळी, चामडी पट्ट्याने त्याला भररस्त्यात मारहाण केली. नागरिकांनी हल्ला करणाऱ्या मुलांना रोखले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर रामोशी गेट पोलीस चौकीतील उपनिरीक्षक अश्विनी पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. चार अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले.

जखमी झालेल्या शाळकरी मुलावर ससून रूग्णालयात उपचार सुरू आहेत. गुन्हा दाखल केलेली मुले अल्पवयीन आहेत. त्यांच्या पालकांना याबाबतची माहिती दिली. मुलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अल्पवयीन असल्याने त्यांना अटक करण्यात आली नाही, असे उपनिरीक्षक पवार यांनी सांगितले.

## LAC तून लडाखी पशुपालकांना हुसकावण्याचा चीनचा प्रयत्न

### भारतीय नागरिक भिडले, अखेर ड्रॅगनची माघार

**लडाख :** लडाखजवळच्या भारत-चीन सीमेवर गेल्या काही दिवसांपासून तणाव वाढला आहे. दरम्यान लडाखमधील स्थानिक मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमधील वादाचा एक व्हिडीओ समोर आला आहे. चिनी सैनिक प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ (एलएसी) मेंढ्या चरणाऱ्या लडाखमधील मेंढपाळांना तिथून हुसकावण्याचा प्रयत्न करत असल्याचं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. चिनी सैनिक मेंढपाळांना तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत होते तर, मेंढपाळदेखील निर्भयपणे त्यांना तोंड देत होते. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या संघर्षानंतर स्थानिक मेंढपाळ आणि पशुपालकांनी या परिसरात जनावरे चरण्यासाठी नेणं बंद केलं होतं. परंतु, आज (३१ जानेवारी) लडाखमधील काही मेंढपाळ भारताच्याच हद्दीत मेंढ्या चरण्यासाठी घेऊन गेले होते. त्यावेळी मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमध्ये संघर्ष झाल्याचं पाहायला मिळालं.



प्रत्यक्ष सीमारेषेजवळच्या कुरणांमध्ये मेंढ्या चरायला नेणाऱ्या मेंढपाळांना चिनी सैनिकांनी तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी लडाखी मेंढपाळांनी चिनी सैनिकांना निक्षून सांगितलं की, ह्यही भारताची हद्द आहेह्ण. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ लडाखच्या पूर्व भागातला असल्याचं सागितलं जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर भारतीय लष्कराने या परिसरातील सुरक्षा वाढवली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पूर्व लडाखमधील स्थानिक पशुपालकांनी एलएसीजवळच्या (छअउ) भागात गुरे चरायला नेणं बंद केलं होतं. पूर्व लडाखमधील पशूपालकांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ गुरे चरायला नेण्याची ही गेल्या दोन वर्षांमधली पहिलीच घटना आहे. दरम्यान, यावेळी भारतीय पशूपालकांनी या जमिनीवर आपला हक्क सागितला. त्याचबरोबर चिनी सैन्याला माघार घ्यायला लावली.

पूर्व लडाखच्या चुशूलमधील नगरसेवक कोंचोक स्टॅनजिन यांनी मेंढपाळ आणि चिनी सैनिकांमधील वादाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर शेअर केला आहे. तसेच या मेंढपाळांचं कौतुक केलं आहे. मेंढपाळांनी दाखवलेल्या हिंमतीबद्दल त्यांची पाठ थोपटली आहे. तसेच मेंढपाळांच्या पाठिशी उभ्या राहिलेल्या भारतीय सैनिकांचेही आभार मानले.

स्टॅनजिन यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, पशूपालकांनी पूर्व लडाखच्या सीमावती भागात म्हणजेच पँगॉन्गच्या उत्तरेकडील किनारी भागात असलेल्या कुरणांवर हक्क सांगितला, त्यांची गुरे तिथे चरण्यासाठी नेली, त्याचवेळी भारतीय लष्करही त्यांच्या पाठिशी उभं होतं. हे सगळं पाहून आनंद झाला. इतके चांगले नागरी-लष्करी संबंध राखल्याबद्दल सीमावरती भागात राहणाऱ्या भारतीय नागरिकांचे आणि या नागरिकांची हित जपल्याबद्दल भारतीय लष्कराचे मी आभार मानतो.

## पुण्याचे पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची बदली;

# अमितेश कुमार नवीन पोलीस आयुक्त

**पुणे :** पुण्याचे पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची बदली करण्याचे आदेश गृह विभागाने बुधवारी सायंकाळी बुधवारी दिले.नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची पुणे पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.गेले दोन महिने पुण्याचे पुणे पोलीस दलातील सह पोलीस आयुक्तपद रिक्त होते. सह पोलीस आयुक्त पदी कोकण परीक्षेत्राचे महानिरीक्षक प्रवीण पावर यांची नियुक्ती करण्यात आली.



पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची गृहरक्षक दलाच्या महासमादेश महासमादेशकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रितेश कुमार यांनी शहरातील गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी कठोर पावले उचलली होती. शहरातील ११ गुंड टोळ्यांविरुद्ध मोका कारवाई तसेच शंभर गुंडाविरुद्ध कारवाई करून जरब बसवली होती.अतिरिक्त पोलीस आयुक्तपदी शैलेश बलकवडी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अतिरिक्त पोलीस आयुक्तपदी शैलेश बलकवडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अखेर लोणावळा लोकल दुपारी धावली!

### दोन एक्स्प्रेस गाड्यांना कर्जत, लोणावळ्यात थांबाही सुरू

**पुणे :** शिवाजीनर-लोणावळा लोकल सेवा आता दुपारच्या वेळेतही सुरू राहणार आहे. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या दुपारच्या लोकलला बुधवारी हिरवा झेंडा दाखविला. यामुळे आता या मार्गावरील प्रवाशांची सोय होणार आहे. याआधी या मार्गावर दुपारी तीन तास लोहमार्गांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी ही सेवा बंद ठेवली जात होती.



केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री दानवे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे लोणावळा स्थानकावरून गाडीला हिरवा झेंडा दाखविला. पुणे विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक ब्रिजेशकुमार सिंह, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ.मिलिंद हिरवे, वरिष्ठ विभागीय अभियंता मनीषकुमार सिंह आणि मुंबई विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अमरेंद्र सिंह उपस्थित होते.

पुणे-लोणावळा दरम्यान लोकलच्या दिवसभरात ४० फेऱ्या होतात. या लोकलने दररोज ६० हजार प्रवासी प्रवास करतात. पुणे-लोणावळा लोकल सेवा सकाळी ११.१५ ते दुपारी ३ या काळात तर लोणावळा-पुणे लोकल सेवा सकाळी १० ते दुपारी २.५० या कालावधीत बंद ठेवली जात होती. यामुळे दुपारी या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत होती. त्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा समावेश होता. महाविद्यालये दुपारी सुटतात अशा विद्यार्थ्यांना लोकलसाठी काही तास स्थानकावर प्रतीक्षा करीत थांबावे लागत होते अथवा इतर पर्यायांचा प्रवासासाठी वापर करावा लागत होता. आता त्यांची दुपारच्या लोकलमुळे प्रवासाची सोय होणार आहे.

याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई झ चेन्नई एग्मोर झ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या एक्स्प्रेसला लोणावळा स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-भुवनेश्वर -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या कोनार्क एक्स्प्रेसला कर्जत स्थानकावर थांबा देण्यात आला आहे.

**शिवाजीनगर ते लोणावळा**

दुपारी १२.०५ वाजता सुटून १.२० वाजता पोहोचणार

लोणावळा ते शिवाजीनगर

दुपारी ११.३० वाजता सुटून १२.४५ वाजता पोहोचणार

## एमपीएससीकडून उमेदवारांवर कारवाईचा बडगा

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत गैरप्रकार, गैरवतर्णूक करून नियमाचे उल्लंघन केलेल्या उमेदवारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. संबंधित उमेदवारांना एमपीएससीच्या परीक्षांसाठी प्रतिरोधित करण्याची कारवाई करण्यात आली असून एमपीएससीने एक्स या समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली.




सहायक नगर रचनाकार, महाराष्ट्र शहर नियोजन आणि मूल्य निर्धारण सेवा, गट ब २०२२ या भरतीच्या अर्जातील दाव्याच्या अनुषंगाने मुलाखतीच्या वेळी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर न केल्याने अर्जातील दावा खोटा ठरत असताना मुलाखतीस पात्र करावे, याकरीता आयोगाच्या अधिकाऱ्यांना धमकावून आयोगावर प्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याने योगेश उत्तमराव मेतलवाड यांना आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता २० नोव्हेंबर २०२२ पासून म्हणजेच या परीक्षेच्या दिनांकापासून दोन वर्ष कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येत आहे.

सचिन नवनाथ बागलाने यांनी ब्लू टूथ हेडफोन बाळगून केलेल्या गैरवतर्नामुळे त्यांची राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची उमेदवारी रद्द करुन आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ च्या दिनांकापासून पाच वर्ष कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येत आहे. धमकावून आयोगावर प्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याने योगेश उत्तमराव मेतलवाड यांना आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता २० नोव्हेंबर २०२२ पासून म्हणजेच या परीक्षेच्या दिनांकापासून दोन वर्ष कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येत आहे.सुरेश कारभारी बेलोटे या राज्यकर निरीक्षक पदावर कार्यरत उमेदवाराने कार्यक्षेत्राबाहेर पदाचा धाक दाखवत आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन करून बेशिस्त वतर्नाद्वारे परीक्षेसारख्या संवेदनशील कामामध्ये जाणीवपूर्वक व कुहेतूने अडथळे निर्माण केल्याबद्दल त्यांची राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची उमेदवारी रद्द करण्यासह आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता प्रस्तुत परीक्षेच्या दिनांकापासून (२३ जानेवारी, २०२३ पासून) २ वर्ष कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येत आहे. केवलसिंग चैंनसिंग गुसिंगे यांनी महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा २०२१ दरम्यान स्वतःजवळ भ्रमणध्वनी व अन्य अनधिकृत साहित्य ठेऊन केलेल्या गैरवतर्नामुळे त्यांची प्रस्तुत परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यासह आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षाकरीता कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येत आहे.

बालाजी ज्ञानेश्वर पवार या पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत उमेदवाराने कार्यक्षेत्राबाहेर पदाचा धाक दाखवत आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन करुन बेशिस्त वतर्नाद्वारे परीक्षेसारख्या संवेदनशील कामामध्ये जाणीवपूर्वक व कुहेतूने अडथळे निर्माण केल्याबद्दल त्यांची राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ ची उमेदवारी रद्द करण्यासह आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ च्या दिनांकापासून २ वर्ष कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येत आहे.

# अधिसूचनेचा अर्धानंद!




**सुरेश कोळी**

मराठा आरक्षणासाठी गेले काही महिने सुरू असलेले आंदोलन मुंबईच्या वेशीवर धडकल्यावर या आंदोलनावर तोडगा निघाला असे द्यदाखवणेह्ल आवश्यक होतेच. ती आवश्यकता सरकार आणि आंदोलक या दोघांसही होती. त्यासाठी आंदोलनकर्ते आणि सरकार या दोघांस उभय बाजूंनी मंजूर होईल अशा मध्यममार्गाची गरज होती. कारण या आंदोलकांचा मुंबई प्रवेश सरकार आणि मुंबई महानगरी या दोघांस पेलला नसता आणि पुन्हा मुंबईत ठिय्या देऊन बसण्याचे आव्हान आंदोलकांसमोर होते. हे वास्तव. त्याची जाणीव उभयतांस होती तरीही आंदोलन मागे घ्यावयाचे तर आंदोलकांचा विजय झाला असे दाखवता येणे आवश्यक होते आणि त्याचवेळी सरकारलाही विजयाचा आनंद मिरवता येणे गरजेचे होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे विजय-विजय खेळाचे सादरीकरण उत्तमपणे केले. नेपथ्य तयार होतेच. त्यामुळे या सगळ्याची द्ययशस्वीह्ल सांगता झाली. त्यासाठी या सर्वांचे अभिनंदन. यातून आंदोलकांस मराठ्यांचे तारणहार आणि मुख्यमंत्र्यांस मराठ्यांचा समर्थ उद्धारकर्ता असे म्हणवून घेता येईल. ते ठीक. पण तेवढ्यापुरतेच!

कारण या यशामागील वास्तव. आता त्या विषयी. सर्व मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळायला हवे, असा आंदोलकांचा आग्रह होता. तो मान्य झाला की नाही याच विषयी संभ्रम आहे. सरकारने हे मान्य केले असे आंदोलक म्हणतात आणि तसे काही होणारे नाही, असे सरकार म्हणते. आंदोलकांच्या समाधानासाठी ही मागणी सरकारने मान्य केली असे समजून घेतले तरी याची अंमलबजावणी करणार कशी? ती करायची तर ओबीसींच्या ताटात जे आहे त्याचे वाटेकरी वाढवायचे? त्यास ओबीसी का म्हणून तयार होतील? पण ते तयार आहेत असे मानून हा निर्णय सरकारने घेतला असे मान्य केल्यास प्रश्न त्याच्या अंमलबजावणीत असेल. हे सरकारला माहीत नाही, असे अर्थातच नाही. पण हे आंदोलन संपावे यासाठी काही तरी केल्यासारखे दाखवणे गरजेचे होते. ते झाले. दुसरा मुद्दा सग्यासोयऱ्यांचा. त्यांनाही आरक्षणाचा लाभ देण्याची आंदोलकांची मागणी होती. ती सरकारने मान्य केली. त्यामुळे एका कुटुंबातील एखादी व्यक्ती स्वतःपुरती ओबीसी असल्याचे सिद्ध करू शकली तर त्या व्यक्तीच्या सग्यासोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ मिळेल. ही बाब कमालीची धोकादायक. आधीच आपल्याकडे आरक्षणासाठी जातीची प्रमाणपत्रे मिळवताना मोठ्या प्रमाणावर लांड्यालबाड्या होतात. असे असताना सगेसोयरे ही नवी वगर्वारी तयार होणे नव्या वादास आमंत्रण देणारे ठरेल. या सग्यासोयऱ्यांची पडताळणी करणार कशी? त्यासाठी आवश्यक यंत्रणा सरकारकडे आहे काय?

आंदोलनाचा सगळा भर अपात्र व्यक्तींस नोकऱ्या मिळतात, पण पात्र मराठ्यांस त्या नाकारल्या जातात या भावनिक सत्यात होता. भावनेच्या अंगाने सुरू असलेल्या आंदोलनाची सांगता यशस्वी झाली अशी भावना निर्माण व्हावी यासाठी सरकारनेही भावनिक तोडगा सादर केला. या तोडग्याचा अध्यादेश सरकारने सादर केल्याचे आंदोलक म्हणतात. पण तो अध्यादेश नाही. आहे तो केवळ या संभाव्य अधिसूचनेचा मसुदा. आता या मसुद्यावर १६ फेब्रुवारीपर्यंत हरकती मागवल्या जाणार आहेत. त्या कोट्यवधी नाही तरी लाखांत येतील हे निश्चित. त्यांचा विचार न करणे राजकीयदृष्ट्या न परवडणारे असेल. तेव्हा त्यावर विचार होऊन निर्णय घ्यावा लागेल. आंदोलक म्हणतात तसे ते यशस्वी झाले असतील तर सध्या सुरू असलेले सर्वेक्षण सुरू ठेवण्याची गरजच काय? आंदोलन यशस्वी आणि तरी सर्वेक्षणही सुरू याच सत्यात या यशाच्या मर्यादा दिसतात. त्याकडे दुर्लक्ष कसे करणार हा प्रश्न. म्हणून भावनेच्या आधारे मिळालेले यश विचारांच्या कसोटीवर टिकवावे लागेल. हे अधिक अवघड. त्यानंतर ओबीसीही हाच मार्ग निवडून मुंबईच्या वेशीवर धडकल्यास आश्चर्य वाटू नये. शेवटी याच मार्गाने काही तरी मिळवता येते असाच अर्थ निघणार असेल तर प्रत्येक समाज-समूह तोच मार्ग निवडणार, हे सत्य. तोपर्यंत या आंदोलनाचे यश साजरे करताना सर्व संबंधितांस–यात आंदोलकही आले–अधिसूचनेच्या अर्धानंदात डुंबावयाचे असेल तर इतरांस हरकत असण्याचे कारण नाही.

---

१ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करणार ; आमदार प्रताप सरनाईक यांची माहीती

# वेदमूर्ती गजानन ज्योतकर यांना शिव गौरव पुरस्कार जाहीर

**भाईंदर** : ५०० वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा, वेळोवेळी झालेला संघर्ष यानंतर करोडो राम भक्तांची स्वप्नपूर्ती झाली. श्री राम जन्मभूमी अयोध्या येथे प्रभू श्री रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. २२ जानेवारी रोजी या मंदिरात श्री रामलल्लाच्या मूर्तीचा प्राण प्रतिष्ठा सोहळा झाला. ही ऐतिहासिक घटना असून, या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा करताना महाराष्ट्र राज्यातील बीड जिल्ह्यातील वेदमूर्ती गजानन दिलिपराव ज्योतकर गुरुजी यांनी मुख्य पौरोहित्य केले. त्यांच्या पौरोहित्या खाली प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. इतक्या मोठ्या भव्य ऐतिहासिक सोहळ्यात महाराष्ट्र राज्याच्या ज्योतकर गुरुजीनी संपूर्ण पूजा-विधी , पौरोहित्य करणे ही आनंद आणि अभिमानाची बाब आहे. त्यांना यंदाचा 'शिवगौरव पुरस्कार' जाहीर केला आहे. १ फेब्रुवारी रोजी मीरा-भाईंदर मध्ये सुरू होणाऱ्या विहंग संस्कृती आर्ट फेस्टिव्हलमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल, अशी माहिती बुधवारी आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली.

वेदमूर्ती गजानन दिलिपराव ज्योतकर गुरुजी हे महाराष्ट्र राज्यातील बीड जिल्ह्यातील आहेत. ते सध्या काशी हिंदू विश्व विद्यालय येथे संस्कृत विषय शिकवतात तसेच त्यांचे स्वतःचे पीएचडीचे अध्ययनही सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते अयोध्येतील श्रीराम मंदिरात गाभा-यातील श्री रामलल्लांच्या मूर्तीचे प्राणप्रतिष्ठेचे कार्य विधीवत करण्याचे संपूर्ण समनव्य व पौरोहित्य ही ज्योतकर गुरुजी यांच्या कडे होते. तसेच श्रीराम मंदिराची पायाभरणी, मूर्ती तयार करणे, विविध धार्मिक कार्यक्रम यामध्ये देखील ज्योतकर गुरुजी यांचा सक्रिय सहभाग होता. त्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे पौरोहित्य महाराष्ट्र राज्याच्या ज्योतकर गुरुजींनी केले याचा आम्हाला अभिमान आहे व म्हणून त्यांना शिव गौरव पुरस्कार देऊन गौरविले जाणार आहे, असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.

VIHANG SANSKRUTI ARTS FESTIVAL PRATAP SARNAIK

## दिग्गज देणार मीरा –भाईंदर फेस्टिव्हलला भेट



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी फेस्टिवलला भेट देणार आहेत. तर उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस, नीलम गोऱ्हे, मंत्री धनंजय मुंडे, उदय सामंत , खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा असे दिग्गज ही फेस्टिव्हलला भेट देणार आहेत. कला व आपल्या संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या सर्व मीरा भाईंदरकर नागरिकांनी चारही दिवस या आर्ट फेस्टिव्हलमध्ये सहभागी व्हावे , असे आवाहन आयोजक आमदार प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

## 'असे' होईल आर्ट फेस्टिव्हल

यंदाही १ ते ४ फेब्रुवारी दरम्यान प्रताप सरनाईक फाउंडेशन व संस्कृती युवा प्रतिष्ठान यांच्याकडून या आर्ट फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर पूर्व येथे हे फेस्टिव्हल होणार आहे. १ फ़ेब्रुवारी रोजी प्रसिद्ध गायिका मैथिली ठाकुर यांचा गाण्याचा कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता होणार आहे. तर २ फेब्रुवारी रोजी सकाळी ६. ३० वाजता प्रसिद्ध बासरी वादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचे बासरी वादन त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसह होणार आहे. जग प्रसिद्ध असलेले पंडीत चौरसिया पहिल्यांदा मीरा भाईंदर शहरात येत असल्याने मोठ्या संख्येने कलाप्रेमींनी यावेळी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता गायिका गीता रबरी यांचा गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे. ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ६. ३० वाजता ४ दिग्गज कलाकारांची जुगलबंदी अनुभवता येणार आहे. पंडित सतीश व्यास यांचे संतूर वादन , उस्ताद रफिक खान यांचे सितार वादन , पंडित मुकुंदराज देव यांचे तबला वादन , पंडित शैलेश भागवत यांचे शेहनाई वादन होणार आहे. तर याच दिवशी ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता 'गीत रामायण' हा सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. रविवार ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ६. ३० वाजता भाग्यश्री व धनश्री या बहिणींचा प्रसिद्ध असलेला गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे. तर याच दिवशी सायंकाळी ७ वाजता 'जय श्री राम – रामायण ' हे महानाट्य सादर होणार आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार शशिकांत धोत्रे यांचे चित्र प्रदर्शन या फेस्टिव्हल मध्ये असणार आहे तसेच 'वॅक्स म्युझियम ' चे दालन असणार असून, त्यात २५ प्रसिद्ध व्यक्तींचे मेणाचे पुतळे लोकांना पाहता येणार आहेत.

---



# चित्रपटसृष्टीचा सम्राट अशोक

**आपल्या** दर्जेदार अभिनयाने प्रेक्षकांना वेड लावणाऱ्या आणि आपल्या विनोदाच्या जबरदस्त टायमिंगने प्रेक्षकांना खदखदून हसवणाऱ्या मराठी चित्रपटसृष्टीतील 'अशोक सराफ' या कलाकाराला कोण नाही ओळखत? मराठी चित्रपटसृष्टीत 'मामा' म्हणून ओळखले जाणारे 'अशोक सराफ' आजही प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य करत आहेत. मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी अशा तीनही माध्यमांत आपल्या चतुरस्त्र अभिनयाने ठसा उमटवण्यात यशस्वी ठरलेले कलाकार म्हणजे 'अशोक सराफ'! ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट ते डिजिटल सिनेमा असा मोठा टप्पा गाठणाऱ्या अशोक मामांनी मराठी चित्रपटांतील विनोदाला वेगळी ओळख दिली, तर 'अशोक सराफ' यांना मराठी चित्रपटातून 'खरी ओळख' मिळाली. त्यांचे काम पाहून त्यांना सिनेविश्वातील लोक त्यांना 'अशोक सम्राट' म्हणू लागले. वयाची ७५ ओलांडली तरीही 'अशोक सराफ' आजही विविध माध्यमांमधून लोकांचं मनोरंजन करत आहेत. त्यांच्या कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ वर्षाचा मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

अशोक यांनी पहिल्यांदा लोकप्रिय मराठी लेखक विष्णू सखाराम खांडेकर यांच्या 'ययाति' पुस्तकावर आधारित नाटकात काम केलं. त्यानंतर त्यांनी अनेक नाटकं केली. त्यातून यश मिळायला लागल्यावर त्यांनी त्यांचा मोर्चा सिन ेम ाक ड े वळवला. त्यांना निर्मात्य ाक ड ून सिन ेम ाच्य ा ऑफर येऊ लागल्या. अशोक सराफ यांना पहिल्यांदा कॅमेरासमोर उभा राहण्याचा मुहूर्त मिळाला 'आयलं तुफान दर्याला' या चित्रपटामुळे. १९७३ साली 'आयलं तुफान दर्याला' हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्याआधी १९७१ साली 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात 'अशोक सराफ' झळकले होते. अशोक मामांनी सुरुवातीला काही सिनेमात काम केलं. त्यानंतर १९७५ साली आलेल्या 'पांडू हवालदार' या सिनेमातून मामांना खरी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर मामांनी कधीही मागे वळून पाहिलं नाही. ते मराठी सिनेसृष्टीचा सुपरहिट चेहरा झाले.



मराठी चित्रपटसृष्टीप्रमाणे अशोक सराफ यांनी बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. 'करण अर्जुन' सिनेमातील त्यांची भूमिका असो किंवा मग 'सिंघम' सिनेमातील हेडकॉन्स्टेबल असो. त्यांच्या अभिनयाची जादू त्यांनी सर्वत्र पसरवली. ९०च्या दशकात प्रचंड गाजलेली 'हम पांच' मालिका आजही कोणी विसरलेलं नाही.

### २५० हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये केले काम

अशोक सराफ यांनी १९६९ पासूनच चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीत काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी २५० हून अधिक मराठी चित्रपट केले, त्यापैकी १०० व्यावसायिक हिट ठरले. त्याने बहुतांशी कॉमेडी सिनेमांमध्येच काम केले आहे. मराठीत त्यांनी बऱ्याच चित्रपटात मुख्य भूमिका साकारली. अशोक सराफ यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत अनेक चित्रपट केले. त्यांची जोडी पडद्यावर अनेकदा हिट ठरली. याशिवाय सचिन पिळगावकर यांच्यासोबतचीही त्यांची बॉन्डिंग पडद्यावर अप्रतिम दिसते. हे दोघे खऱ्या आयुष्यातही चांगले मित्र आहेत.



### टीव्ही सीरियलमध्येही मनोरंजन

अशोक सराफ यांनी 'नैना ओ नैना', 'हम पांच', 'ये छोटी बड़ी बातें' यांसारख्या १० टीव्ही मालिकांमध्ये काम करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. अशोक सराफ यांनी १९९० मध्ये मराठी सिनेसृष्टीच्या प्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता जोशी यांच्याशी लग्न केले. या दोघांच्या वयात १८ वर्षांचा फरक आहे. त्यांना एक मुलगाही आहे. अशोक आणि निवेदिता सराफ यांचा मुलगा अभिनयक्षेत्रात नाही. त्याने आपल्या आई–वडिलांपेक्षा करिअरचा वेगळा मार्ग स्वीकारला असून, तो बाहेरगावी शेफ म्हणून काम करत आहे.

### सगळ्या इंडस्ट्रीचे 'मामा'

अनेकांना टोपण नावाने ओळखले जाते किंवा काही नावं प्रेमाने मिळतात. अशोक सराफांना पूर्ण मराठी चित्रपटसृष्टीत मामा या नावाने ओळखले जाते, त्या मागे एक मजेदार किस्सा आहे. ७०च्या काळात कोल्हापूरला एका चित्रपटाचे शूट चालले होते आणि तिथला कॅमेरामन होता 'प्रकाश शिंदे'. तो त्याच्या छोट्या मुलीला बरोबर घेऊन शूटिंगला येत असे आणि त्या मुलीला त्याने हा अशोक मामा अशी ओळख करून दिली. थोड्याच दिवसांत सेटवरील सर्वच लोक त्यांना मामा म्हणू लागले आणि हळूहळू हेच नाव त्यांना चिकटले आणि ते संपूर्ण इंडस्ट्रीचे मामा झाले.

### मराठी चित्रपट

आयत्या घरात घरोबा, आमच्यासारखे आम्हीच, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, गंमत जंमत, भुताचा भाऊ, माझा पती करोडपती, अशी ही बनवाबनवी, फेका फेकी, एक डाव भुताचा, एक डाव धोबीपछाड, आलटून पालटून, सगळीकडे बोंबाबोंब, साडे माडे तीन, कुंकू घनचक्कर, नवरा माझा नवसाचा चंगु मंगु, अफलातून, वाजवा रे वाजवा, शुभमंगल सावधान, जमलं हो जमलं, गोडीगुलाबी, गडबड घोटाळा, बाळाचे बाप ब्रह्मचारी, खुल्लम खुल्ला, धमाल नाम्याची, संसार, कळत नकळत, पैजेचा विडा, बहुरूपी, धूमधडाका, निशाणी डावा अंगठा, झुंज, टोपी वर टोपी.

### पुरस्कार

- राम राम गंगारामचा पहिला फिल्मफेअर आणि एकूण ५ पुरस्कार
- पांडू हवालदार या चित्रपटासाठी महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार
- सवाई हवालदार या चित्रपटाचा स्क्रीन पुरस्कार
- भोजपुरी फिल्म पुरस्कार माईका बिटुआ
- मराठी चित्रपटांसाठी १० राज्य सरकारचे पुरस्कार
- महाराष्ट्र शासन पुरस्कार
- महाराष्ट्र राज्य नाट्य पुरस्कार
- झी गौरव पुरस्कार
- महाराष्ट्राचा फेवरेट कोण? मधील सर्वोत्कृष्ट कॉमेडियन पुरस्कार

संकलन
राकेश मोरे

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# वळतीच्या जिल्हा परिषद शाळेतील मुलींची जिल्हास्तरीय लेझीम स्पर्धेत बाजी

## शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे जिल्हास्तरीय स्पर्धा उत्साहात

**वळती / सुनिल भोर**

वळती (ता.) पुणे जिल्हयातील बालेवाडी येथे यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवानिमित्त दिनांक २६ व ३० जानेवारी २०२४ रोजी विविध स्पर्धा पार पडल्या. लेझीम स्पर्धेत १३ तालुक्यातील १७ संघांनी लेझीमचे सादरीकरण केले. वळती शाळेतील मोठा गट (मुली ) या संघाने मंगळवारी (दि.३० )लेझीमच्या खेळाच्या सादरीकरणातून 'बळीराजाची कहाणी सादर केली. या अटीतटीच्या लेझीम क्रिडा स्पर्धेत मुलींनी तृतीय क्रमांक पटकाविला.

मंगळवारी (दि.३० ) रोजी बालेवाडी येथे विजयी झालेल्या



स्पर्धेतील संघाचे शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड व इतर मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले


लेझीम स्पर्धेतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक विलास डोळस, अशोक मावळे, देविदास शेळके, संतोष जाधव, रोहिदास मुळे, शकुंतला वाघ, तृप्ती घोलप व तारामती मुळे यांनी मार्गदर्शन केले होते.

गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, गटशिक्षण अधिकारी सविता माळी, मंचर बीटचे शिक्षणविस्तार अधिकारी गजानन पुरी वळती केंद्राचे केंद्रप्रमुख, साहेबराव शिंदे, वळती केंद्रातील शिक्षक यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच या लेझीम स्पर्धेच्या विजयाने वळती ग्रामस्थांनी व पालकांनी आनंदोत्सव साजरा केला .

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयेंद्र भोर, सरपंच आनंद वाव्हळ , उपसरपंच तेजस भोर, तसेच गावातील शिक्षणप्रेमी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले . वळती गावचे ग्रामस्थ विठ्ठल लोंढे, बाळू गायकवाड व रोहिणी अजाब यांनी बालेवाडी येथे मुलांना विशेष सहकार्य केले.

# स्वातंत्र्य वीर सावरकर २२ मार्चला होणार रिलीज

## अंकिता रणदीप हुड्डासोबत दिसणार



बिग बॉस १७ मध्ये मने जिंकल्यानंतर आता अंकिता लोखंडे दिसणार रणदीप हुड्डासोबत या चित्रपटात स्वातंत्र्य वीर सावरकरमध्ये झळकळणार आहे. अंकिता लोखंडे बिग बॉस १७ मध्ये गौरवशाली प्रवास संपल्या नंतर अभिनेत्री अंकिता लोखंडे स्वातंत्र्य वीर सावरकर या नव्या चित्रपटात दिसणार आहे. आता या चित्रपटाची रिलीज डेट सुद्धा ठरली असून २२ मार्च २०२४ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

आगामी देशभक्तीपर आधारित चित्रपटात अंकिता रणदीप हुड्डासोबत दिसणार आहे. स्वातंत्र्य वीर सावरकर हा चित्रपट सर्वात अपेक्षित चित्रपटांपैकी एक आहे आणि प्रेक्षक चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेच्या अपडेटची आतुरतेने वाट पाहत आहेत. रणदीप हुड्डा आणि अंकिता लोखंडे स्टारर स्वातंत्र्य वीर सावरकर २२ मार्च २०२४ रोजी मोठ्या पडद्यावर येणार असल्याचं कळतंय.

# डॉ.मुनीर तांबोळी यांची राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस पदी निवड




**- राजेंद्रकुमार शेळके -**

**पुणे :** मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष, हिन्दुस्तान २४ तासचे मुख्य संपादक डॉ. मुनीर तांबोळी यांनी आपल्या शेकडो सहकाऱ्यांसह महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्त करण्यात आले.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा.खासदार सुनील तटकरे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अल्पसंख्यांक राज्य प्रमुख इद्रिस नायकवडी, प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण, रोजगार व स्वयंरोजगार विभाग महाराष्ट्र राज्य प्रमुख मेघा पवार, सरचिटणीस मेहबूब सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.त्यावेळी डॉ.श्रेयस ठाकूर, पंकज शहा, कुमार नागपाल, सूरज नागे, शमीम खान, शहनाज खान, शाहीन खान, नेहा किरनली यांच्या सह शेकडो सहकाऱ्यांनी पक्ष प्रवेश केला.डॉ. मुनीर तांबोळी यांनी सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत. रोजगार, कौशल्य विकास, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.

दरम्यान अजितदादा पवार यांच्या विकासाच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन महाराष्ट्रात अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी दादांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळत असल्याने या संधीचे नक्कीच सोने करण्यात येईल अशी प्रतिक्रिया या वेळी डॉ.मुनीर तांबोळी यांनी दिली.

# जीवनातील यशस्वीतेसाठी वेळेचे आणि ताणतणावाचे व्यवस्थापन आवश्यक

## प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांचे प्रतिपादन

**- राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघीरे कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँड कॉमर्स, ओतूर येथील वाणिज्य विभागअंतर्गत स्व. अनंतराव पवार यांच्या पुण्यतिथी निमित्ताने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. सदर व्याख्यानमालेसाठी अतिथी व्याख्याते म्हणून डॉ. जी. एम. डुंबरे (माजी उप प्राचार्य व माजी वाणिज्य विभाग प्रमुख, अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय ओतूर), आणि डॉ. टाकळकर एस. डी ( ग्रामोन्नती मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव) उपस्थित होते. प्रमुख अतिथी डॉ. जी.एम. डुंबरे यांनी ₹वेळेचे व्यवस्थापन₹ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात वेळेचा योग्य वापर करणे हे एक कौशल्य आहे असे सांगून वेळेचा दुरुपयोग होणार नाही याकरिता विद्यार्थ्यांनी योग्य व्युहरचना, अभ्यास कौशल्य, इच्छाशक्ती व आरोग्य याकडे लक्ष देण्यास सांगितले. त्यांनी आपल्या मनोगतून वेळेच्या व्यवस्थापनाची आवश्यकता, वेळेच्या व्यवस्थापनाची तंत्रे, वेळेच्या व्यवस्थापनाचे महत्त्व आणि फायदे इत्यादी मुद्द्यांवर उदाहरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन समजावून सांगितले.



तसेच डॉ. टाकळकर एस.डी. यांनी ₹ताण तणावाचे व्यवस्थापन₹ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना ताण तणाव का निर्माण होतो? आणि ताणतणाव कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घेतली पाहिजे हे त्यांनी वेगवेगळ्या डेमो च्या आणि उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. परीक्षेचा ताण तणाव कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणती तंत्रे विचारात घ्यावी उदा. वाचनाचे व लेखनाचे वेळापत्रक ठरविणे, अभ्यासाचे मनन- चिंतन, आणि पाठपुरावा करणे, ज्या विषयाची भीती वाटते त्या विषयाला अधिक वेळ देणे, मित्रांबरोबर त्या विषयाच्या संदर्भात चर्चा करणे यासारखी अनेक महत्वपूर्ण आणि शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त माहिती देऊन विद्यार्थ्यांना देऊन मार्गदर्शन केले.तसेच ताणतणाव कमी करण्याचे उपाय प्रात्यक्षिकाद्वारे कृतीतून दाखवून दिले.

प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासक्रमासंबंधी वेळेचे अचूक नियोजन करून अभ्यास केला तर विद्यार्थ्यांच्या मनातील भीती नाहीशी होऊन विद्यार्थी परीक्षेत यशस्वी होऊ शकतो. तसेच जीवनातील यशस्वीतेसाठी वेळेचे आणि ताणतणावाचे व्यवस्थापन आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय असून त्याचा पुरेपूर लाभ घेतला पाहिजे असे अवाहन केले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. गावडे व्ही. वाय आणि वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सदर व्याख्यानमालेचे प्रास्ताविक डॉ. लंगडे एस. एस. (वाणिज्य विभागप्रमुख) यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कुंडलिक व्हि.डी. यांनी केले तर डॉ. काळदंते के. एच. यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# ३,४ फेब्रुवारी रोजी 'इंडिया इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल'


## इन्फोसिस फाऊंडेशन आणि भारतीय विद्या भवन तर्फे आयोजन

पुणेः इन्फोसिस फाऊंडेशन आणि भारतीय विद्या भवनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत दोन दिवसीय 'इंडिया इंटरनॅशनल डान्स फेस्टिव्हल'चे आयोजन दि.३ आणि ४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.दि.३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच ते रात्री साडेआठ तसेच ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी दीडपर्यंत आणि सायंकाळी साडेचार ते रात्री साडेआठपर्यंत या फेस्टिव्हलमधील नृत्य सादरीकरणे सरदार नातू सभागृह (भारतीय विद्या भवन,सेनापती बापट रस्ता ) येथे होतील.

भरतनाट्यम, कथक,ओडिसी, मोहिनीअट्टम, कथकली, बंगाली लोकनृत्य अशा नृत्य प्रकारांचा या महोत्सवात समावेश आहे.नृत्य महोत्सवाचे उदघाटन नृत्यगुरु सुचित्रा दाते आणि शशिकला रवी यांच्या उपस्थितीत होईल.अनेक संस्था आणि कलाकार नृत्य सादरीकरणे करणार आहेत. २०१९ मध्ये या नृत्य महोत्सवाची सुरुवात झाली.यावषी एकूण ८० कलाकार या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

रसिका गुमास्ते या महोत्सवाच्या संयोजक असून संयोजन समितीत अस्मिता ठाकूर,नेहा मुथियान,शमा अधिकारी यांचा समावेश आहे. हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य आहे.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव नंदकुमार काकिर्डे यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

# अभिनेता अनिल कपूरने ग्रुप कॅप्टन राकेश जयसिंगच्या मेकिंगची दाखवली झलक



सिनेमॅटिक आयकॉन अनिल कपूर स्टारर 'फाइटर' सध्या चर्चेत असताना त्याने जगभरात प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. फायटर चित्रपटाच सर्वत्र कौतुक होताना दिसतंय सोबतीला या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर कमाई केली आहे. सिनेमागृहांमध्ये सतत चर्चेत आहे. फायटर मधील कॅप्टन रॉकी उर्फ अनिल कपूरने सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित चित्रपटाच्या सेटवरून एक अफलातून बीटीएस व्हिडिओ सोशल मीडिया वर शेयर केला आहे.

या व्हिडिओमध्ये मेगास्टार अनिल कपूर यांनी या भूमिकेसाठी कशी तयारी केली आणि पद्यामागाची खरी गंमत यातून बघायला मिळते. चित्रीकरणातील काही स्नॅपशॉट्सची झलक यातून बघायला अनिल कपूर यांनी इंस्टाग्राम वर हा व्हिडिओ शेयर केला असून त्याला कॅप्शन दिलं कठीण, अधिकृत आणि अटूट. ग्रुप कॅप्टन राकेश जयसिंगच्या निमितीची झलक तुम्हाला दाखवत आहे.

फायटर बद्दल बोलायचे तर या चित्रपटात हृतिक रोशन, दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर, करण सिंग ग्रोव्हर आणि अक्षय ओबेरॉय प्रमुख भूमिका असून नुकतच या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर कमाई केली आहे.

# लोकनृत्य स्पर्धेत पाबे शाळा जिल्ह्यात तिसरी

## सलग दुसऱ्या वर्षी विजयी पताका कायम; गावात विजयोत्सव साजरा




**बालेवाडी (पुणे) : लोकनृत्य स्पर्धेतील पाबे शाळेच्या विजयी स्पधर्कांना बक्षीस देऊन सन्मानित करताना मान्यवर.**

**वेल्हे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीत आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात लोकनृत्य स्पर्धेतील लहान गटातून पाबे (ता.वेल्हे) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संघाने जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकाविला.

जिल्हास्तरीय स्पर्धेत पाबे शाळेने सलग पाचव्यांदा लोकनृत्य स्पर्धेत वेल्हे तालुक्याचे प्रतिनिधित्त्व केले आहे. यापूवी नाचतो डोंबारी, निंबोणीचे लिंबू, एकच राजा इथे जन्मला, दैवत आदिवास्यांचा बिरसा मुंडा आदी लोकनृत्य सादर केले होते. गतवषी बिरसा मुंडा लोकनृत्य जिल्ह्यात अव्वल ठरला होता. यंदाचे हे सलग पाचवे वर्ष होते. धनगरांची थोरवी सांगणाऱ्या यंदाच्या आम्ही धनगर या लोकनृत्याने परीक्षकांची मने जिंकत तृतीय क्रमांकासह सलग दुसऱ्यांदा विजयाला गवसणी घातली आहे.

या यशाबद्दल पाबे ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांनी विजयी स्पधर्कांचे गावातील सोमजाई माता मंदिरात फटाक्यांची आतिषबाजी, हार, पेढे वाटप करत विजयोत्सव साजरा केला.

ग्रामस्थांच्या हस्ते सोमजाई माता मंदिरात विजयी चषकाचे पूजन करून विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. पाबे शाळेच्या लोकनृत्य संघात अथर्व विठ्ठल पवार, सारंगी प्रदीप जगदाळे, ईश्वरी दिलीप तळेकर, ज्ञानेश्वरी युवराज रेणुसे, शितल गणपत रेणुसे, सानिका संदीप रेणुसे, ईश्वरी गोकुळ रेणुसे, शुभ्रा नवनाथ रेणुसे, आर्या विठ्ठल रेणुसे, रिद्धी लक्ष्मण रेणुसे या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या यशासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश कोळी, पदवीधर शिक्षिका मनिषा आजबे, उपशिक्षिका कविता साळुंके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणपत रेणुसे, उपाध्यक्षा मोनाली मरळ, विष्णू तामकर, युवराज रेणुसे, रामदास साळुंके, मयुरी रेणुसे, ज्योती रेणुसे, विद्या पवार, लीलाबाई तळेकर, हिराबाई रेणुसे, आदित्य येणपुरे, यश तामकर, बालाजी पानसरे यांनी परिश्रम घेतले.

या यशाबद्दल शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेल्ह्याचे गटविकास अधिकारी पंकज शेळके, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत उगले, माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, सरपंच ज्योती रेणुसे, उपसरपंच संगिता रेणुसे, शिक्षण विस्तार अधिकारी दीपक नलावडे, केंद्रप्रमुख प्रवीण इंदलकर आदींनी अभिनंदन केले.

# हडपसर माळवाडी भागात पाणी टंचाई, पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांची पायपीट

## पाणी, ड्रेनेज दुर्गंधी आदी समस्यां सोडविण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी यांना दिले समस्यांचे निवेदन

**हडपसर :** हडपसर माळवाडी भागात पाणी टंचाईने नागरिक त्रस्त झाले असुन , पिण्याच्या पाण्यासाठी महिलां व नागरीकांना पायपीट करावी लागत आहे.पाणी समस्यां, ड्रेनेज समस्यां सोडवाव्यात यासाठी

रिपब्लिकन पाटी ऑफ इंडिया हडपसर माळवाडी शाखेच्या वतीने हडपसर क्षेत्रीय अधिकारी बाळासाहेब ढवळेपाटील यांना निवेदन देऊन समस्यां सोडवण्याची मागणी केली.

सर्वे नंबर 165 भैरवनाथ चौक माळवाडी हडपसर या ठिकाणी ड्रेनेज लाईनच्या व पाण्याच्या लाईनच्या संदर्भात हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालय चे सह्या.आयुक्त बाळासाहेब ढवळे निवेदन देण्यात आले पाच सहा महिन्यापासून या भागामध्ये पाण्यासाठी नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत, महिलांना रात्रभर पाण्यासाठी जागावे लागत आहे,पहाटे चारसाडेचार वाजता दहा ते पंधरा मिनिटांसाठी कमीदाबाने पाणी सोडले जाते व लगेच पाणी बंद केले जाते त्यामुळे कोणाला पाणी मिळते तर कोणाला मिळत नाही , पाण्यासाठी नागरिकांना नाहक त्रास करावा लागत आहे, पाण्यासाठी महिलावर्ग रात्र जागून काढतात नियमित झोप हो नसल्यामुळे आरोग्य बिघडत आहे.या भागातील लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाचे नागरी प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे.अनेक कुटुंबाला या पाण्याच्या गंभीर समस्या मुळे वन वन फिरावे लागत असताना अनेक वेळा प्रशासनाला पत्र देऊन सुद्धा समस्यांची कोणीच गोष्टीची दखल घेत नाहीत , माळवाडी भागात अनेक ठिकाणी ड्रेनेज लाईन व चेंबर नादुरुस्त फुटलेले आहेत, फुटलेल्या मैलावाहिनीतून , ड्रेनेज ओव्हर फ्लो होवून मैलापाणी, दुर्गंधीयुक्त घाण सांडपाणी रस्त्यावर वाहात असल्याने परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. घाणीमुळे अनेक नागरिक आजारी पडत आहेत. नागरी प्रश्नांकडे प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे , पाणी पुरवठा सुरळित करण्यात यावा, ड्रेनेज दुरुस्ती करण्यात यावी येत्या चारपाच दिवसात दखल घेतली नाही तर रिपब्लिकन पक्षाच्या वतीने हडपसर क्षेत्रीय कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपाइं पुणे शहर उपाध्यक्ष संतोष खरात यांनी दिला आहे. निवेदन देतेवेळी संतोष खरात उपाध्यक्ष पुणे शहर , अध्यक्ष हडपसर मतदार संघ अध्यक्ष महादेव दंदी,सतीश आल्हाट ,विश्वराज शिरसाट ,उद्धव निकाळजे, विष्णू बडदे ,रुबाब शेख ,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिक्षण विभागाचे डोळे उघडले

**पुणे :** नुकत्याच जाहीर झालेल्या ह्यअसरह्य सर्वेक्षणात राज्याची कामगिरी खालावल्याचे समोर आल्याचा असर शिक्षण विभागावर झाला आहे. या अहवालामुळे खडबडून जाग आलेल्या शिक्षण विभागाने राज्यातील शाळांची पयर्वेक्षकीय यंत्रणा मजबूत करण्याचे आदेश दिले असून, केंद्रप्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील शाळांना अचानक भेटी देणे, विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन विद्यार्थ्यांचे आकलन तपासणे, शिक्षकांना अधिकच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास त्याबाबतची शिफारस शिक्षणाधिकाऱ्यांना करणे अशा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

शिक्षण विभागाने या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. राष्टीय पातळीवरील असर सर्वेक्षणात राज्यातील नांदेड जिल्ह्याचा समावेश होता. त्यात कृति कौशल्य वगळता मूलभूत क्षमता, डिजिटल साक्षरता आणि कौशल्य या निकषाच्या आधारावर नांदेड जिल्ह्याची आणि पर्यायाने राज्याची कामगिरी निराशाजनक झाली. हे सर्वेक्षण एका जिल्ह्यापुरते आणि मोजक्या निकषांच्या आधारे केलेले असले, तरी त्यातून राज्याच्या ग्रामीण भागातील स्थितीचे आकलन होऊ शकते. शासन आणि अधिनस्थ संस्था शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पुरेपूर प्रयत्न करत असतानाही असे परिणाम समोर येणे चिंताजनक असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

या अहवालाच्या पाश्वर्भूमीवर पयर्वेक्षकीय यंत्रणा मजबूत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केंद्रप्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील शाळांना अचानक भेटी देणे, विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन विद्यार्थ्यांचे आकलन तपासणे, शिक्षकांना अधिकच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास त्याबाबतची शिफारस शिक्षणाधिकाऱ्यांना करणे, प्रशिक्षणाबाबत शिफारस आल्यास शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षकाला नजीकच्या जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणासाठी पाठवणे, शिक्षकांच्या प्रशिक्षणानंतरही विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेत फारशी वाढ झाली नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्याने प्राथमिक, माध्यमिक शिक्षण संचालकांना पाठवणे, शिक्षणाधिकाऱ्याने केंद्र प्रमुखाच्या पयर्वेक्षकीय कामकाजावर देखरेख आणि नियंत्रण ठेवून दर महिन्याला अहवाल घेणे आश्यक आहे. या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांची असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# मोबाईल फोन स्वस्त होणार

## सुट्या भागांच्या आयात शुल्कात १० टक्के कपात



अंतरिम अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय



अर्थसंकल्प 2024-25

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार उद्या म्हणजेच १ फेब्रुवारी रोजी अंतरिम अर्थसंकल्प २०२४ सादर करणार आहे. मात्र, अंतिरम अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वीच सरकारने मोबाईल पार्ट्सच्या आयात शुल्कात १० टक्के कपात केली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे मोबाईल फोन आणखी स्वस्त होऊ शकतात.

मोदी सरकारने बुधवारी अर्थसंकल्पापूर्वी मोबाईल पार्ट्सवरील आयात शुल्कात १५ टक्क्यांवरून १० टक्के करण्यात कपात करण्याची घोषणा केली आहे. हा निर्णय केवळ मोबाईल फोन उद्योगाबरोबरच सर्वसामान्यांसाठीही दिलासा देणारा आहे. कारण आयात शुल्क कमी केल्यामुळे मोबाईल फोन निर्मितीचा खर्चही कमी होईल आणि कंपन्या फोनच्या किमतीही कमी करू शकतात.

इंडियन सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशनने यापूर्वी म्हटले होते की, जर सरकारने घटकांवरील आयात शुल्क कमी केले आणि काही श्रेणींमध्ये ते काढून टाकले तर भारतातून मोबाईल फोनची निर्यात पुढील दोन वर्षांत तीन पटीने वाढून ३९ अब्ज डॉलर्स होईल. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ही निर्यात ११ अब्ज डॉलर होती.

भारतीय मोबाइल उद्योगाने २०२४ मध्ये सुमारे ५० अब्ज डॉलर किमतीचे मोबाइल फोन तयार करणे अपेक्षित असून जे पुढील आर्थिक वर्षात ५५-६० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये निर्यात अंदाजे १५ अब्ज डॉलर्स आणि नंतर आर्थिक वर्ष २५ मध्ये २७ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

### 'या' मोबाईल पार्ट्सवर आयात शुल्कात घट

अर्थ मंत्रालयाने ३० जानेवारी रोजी सेल्युलर मोबाइल फोनच्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंवरील शुल्कात १० टक्के कपात करण्याची अधिसूचना काढली. इतर घटकांमध्ये बॅटरी कव्हर, मुख्य लेन्स, बॅक कव्हर, स्क्रू, प्लास्टिक, धातू, सिम सॉकेट, मेटल पार्ट्स, सेल्युलर मॉड्यूल आणि इतर यांत्रिक वस्तूंचा समावेश होतो. तर दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांनी 'एक्स'वर एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, या उपायाद्वारे ड्युटी रॅशनलायझेशन मोबाइल फोन उत्पादन परिसंस्था मजबूत करेल. कस्टम ड्युटीचे तर्कसंगतीकरण उद्योगासाठी अत्यंत आवश्यक निश्चितता आणि स्पष्टता आणते, असे त्यांनी म्हटले आहे.



इंडियन सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन (आयसीईए) चे अध्यक्ष पंकज मोहिंद्रू म्हणाले की, भारतातील मोबाइल उत्पादन स्पर्धात्मक बनवण्याच्या दिशेने सरकारचा हा एक महत्त्वपूर्ण धोरण हस्तक्षेप आहे. इलेक्ट्रॉनिक्स काही वर्षांपूर्वी ९व्या स्थानावरून २०२४ मध्ये भारताच्या ५व्या क्रमांकाच्या निर्यातीत सुधारले आहे. उत्पादन-लिंक्ड प्रोत्साहन योजनेमुळे इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत ५२ टक्क्यांहून अधिक मोबाइलचा वाटा आहे. आयात पर्यायातून बाहेर पडणारा हा पहिला उद्योग आहे. गेल्या ८ वर्षांत निर्यातीत वाढ झाली, असे मोहिंद्रू म्हणाले.



नांगिया अँडरसन इंडिया असोसिएट डायरेक्टर- अप्रत्यक्ष कर, खुशबू त्रिवेदी यांनी सांगितले की, बॅटरी कव्हर, मेन लेन्स, बॅक कव्हर्स आणि इतर प्लास्टिक आणि मेटल मेकॅनिकल वस्तूंवरील आयात शुल्क कमी करून १० टक्के केले आहे. स्थानिक उत्पादनाला चालना देण्यासाठी काही घटकांचे उत्पादन शून्य शुल्क दरावर आणले. याव्यतिरिक्त, चांगल्या संरेखनासाठी एलसीडी पॅनेलसाठी डिस्प्ले असेंबली पार्ट्सवरील शुल्क १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे.

### फोन उद्योगाची मागणी सरकारकडून मान्य

मोबाईल फोन क्षेत्राशी निगडित कंपन्या जवळपास १० वर्षांपासून भारतातील स्मार्टफोन उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि चीन आणि व्हिएतनाम यासारख्या प्रादेशिक स्पर्धकांशी समान पातळीवर स्पर्धा करण्यासाठी आयात शुल्क कमी करण्याचा आग्रह धरत होत्या. संसदेत अंतरिम अर्थसंकल्प सादर होण्याच्या अवघ्या एक दिवस अगोदर सरकारने मोबाईल फोन उत्पादकांची ही मागणी मान्य केली.

# प्रमुख पायाभूत क्षेत्रांचा १४ महिन्यांचा नीचांक

**नवी दिल्ली :** कच्चे तेल, वीज, पोलाद आणि सिमेंट यांसारख्या क्षेत्रांच्या खराब कामगिरीमुळे डिसेंबर २०२३ मध्ये आठ प्रमुख पायाभूत सुविधा क्षेत्रांची वाढ १४ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर म्हणजे ३.८ टक्क्यांवर आली आहे. ही अधिकृत आकडेवारी बुधवारी जाहीर झाली.

नोव्हेंबरमध्ये प्रमुख क्षेत्र (कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि वीज) वाढ ७.९ टक्के होती. तर डिसेंबर २०२२ मध्ये तो ८.३ टक्के होता. शेवटचा नीचांक ऑक्टोबर २०२२ मध्ये ०.९ टक्का नोंदवला गेला होता.

एप्रिल-डिसेंबर २०२३-२४ मध्ये आठ क्षेत्रांची वाढ वार्षिक आधारावर ८.१ टक्के इतकी होती. तर डिसेंबर २०२३ मध्ये कोळसा, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि वीज उत्पादनातील वाढीचा दर कमी झाला. केवळ नैसर्गिक वायूचे उत्पादन डिसेंबर २०२२ मधील २.६ टक्क्यांवरून वरील महिन्यात ६.६ टक्क्यांनी वाढले.

औद्योगिक उत्पादन निर्देशांकात (आयआयपी) आठ प्रमुख क्षेत्रे ४०.२७ टक्के योगदान देत असल्याने या आकडेवारीला खूप महत्त्व आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कच्च्या तेलाचे उत्पादन १ टक्क्यांनी घसरले. वीज, पोलाद आणि सिमेंट उत्पादनातील वाढीचा दर डिसेंबर २०२२ मध्ये अनुक्रमे १०.४ टक्के, १२.३ टक्के आणि ९.५ टक्क्यांच्या तुलनेत डिसेंबर २०२३ मध्ये ०.६ टक्का, ५.९ टक्के आणि १.३ टक्क्यांवर घसरला.

अदिती नायर, चीफ इकॉनॉमिस्ट, हेड - रिसर्च अँड आउटरीच, इक्रा लि. यांनी सांगितले की, मुख्य क्षेत्राचा विस्तार निम्मा घसरला असून १४ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आला आहे. डिसेंबर २०२३ मधील प्रमुख क्षेत्राच्या वाढीतील घसरणीमुळे आम्ही त्या महिन्यासाठी आयआयपी १-३ टक्क्यांपर्यंत कमी होईल.

# अंतरिम अर्थसंकल्पापूर्वी शेअर बाजारात तेजी

## सेन्सेक्सची ६१२ अंकांनी उसळी

### एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागांची खरेदी

### निफ्टीही २०४ अंकांनी वधारला




**मुंबई :** गुरुवार, १ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी भारतीय शेअर बाजारात तेजी होती. एचडीएफसी बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागांची जोरदार खरेदी झाल्यामुळे बुधवारी बेंचमार्क इक्विटी निर्देशांक जवळपास १ टक्क्यांनी वाढले. केंद्र सरकारचा अंतरिम अर्थसंकल्प आणि यूएस फेड व्याजदराचा निर्णय - या दोन महत्त्वाच्या घटनांकडे गुंतवणूकदारांचे लक्ष लागले असून भारतीय शेअर बाजारातील तेजीने गुंतवणूकदार खूप आशावादी असल्याचे दिसते. दरम्यान, भारतीय चलन बाजारात बुधवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ६ पैशांनी मजबूत होऊन ८३.०४ झाला.

दि ३० शेअर बीएसई सेन्सेक्स ६१२.२१ अंक किंवा ०.८६ टक्क्यानी वाढून ७१,७५२.११ वर बंद झाला. दिवसभरात, तो ७११.४९ अंक किंवा १ टक्क्यांनी वाढून ७१,८५१.३९ या कमाल पातळीवर पोहोचला होता. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी २०३.६० अंकांनी किंवा ०.९५ टक्क्यानी वाढून २१,७२५.७० वर बंद झाला.

सेन्सेक्स कंपन्यांमध्ये सन फार्मा, टाटा मोटर्स, स्टेट बँक ऑफ इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा, मारुती, बजाज फिनसर्व्ह, पॉवर ग्रिड आणि अल्ट्राटेक सिमेंट या कंपन्यांचे समभाग वाढले. तर लार्सन अँड टुब्रोने डिसेंबर तिमाहीच्या आर्थिक निकालानंतर कंपनीच्या समभागात चार टक्के घसरण झाली. अधिक घसरण केली.


आशियाई बाजारांमध्ये टोकियो, शांघाय आणि हाँगकाँगमध्ये घसरण झाली तर सेऊलमध्ये सकारात्मक वातावरण होते. युरोपीय बाजारांमध्ये दुपारपर्यंत संमिश्र स्थिती होती. मंगळवारी यूएस बाजार मुख्यतः घसरणीने बंद झाले.

अंतरिम अर्थसंकल्पापूर्वी भारतीय बाजारपेठांमध्ये सकारात्मक वातावरण होते. वाढत्या कर महसुलामुळे बाजाराला वित्तीय तूट कमी होण्याची अपेक्षा आहे. एफओएमसी बैठकीपूर्वी जागतिक बाजाराचे संकेत संमिश्र आहेत आणि यूएस १०-वर्षांचे उत्पन्न किरकोळ कमी झाले आहे, असे जियोजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले.

नोव्हा अ‍ॅग्रीटेकची बुधवारी शेअर बाजारात चांगली सुरुवात झाली. त्याचा हिस्सा बीएसईवर ३६.५८ टक्क्यांच्या प्रीमियमसह ५६ रुपयांवर सूचीबद्ध झाला. त्याच वेळी, ते एनएसईवर ३४.१५ टक्क्यांच्या प्रीमियमसह ५५ रुपयांवर सूचीबद्ध झाले. त्याची इश्यू किंमत ४१ रुपये होती.

जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड ०.९१ टक्क्यानी घसरून ८२.१२ अमेरिकन डॉलर्स प्रति बॅरल झाले. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) मंगळवारी १,९७०.५२ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली, असे एक्सचेंजच्या आकडेवारी सांगते. तर मंगळवारी बीएसई निर्देशांक ८०१.६७ अंकांनी किंवा १.११ टक्क्यांनी घसरून ७१,१३९.९० वर तर निफ्टी २१५.५० अंकांनी किंवा ०.९९ टक्क्यांनी घसरून २१,५२२.१० वर बंद झाला.

# मुद्रांक अभय योजनेच्या पहिल्या टप्प्याला मुदतवाढ




**पुणे :** नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या वतीने राज्यभरात राबविण्यात येत असलेल्या मुद्रांक अभय योजनेला राज्यभरातून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला झालेला विलंब आणि अनेक संस्था, संघटनांनी मुदतवाढ देण्याची केलेली मागणी लक्षात घेऊन नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागानेही मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविला होता. त्यानुसार राज्य शासनाचे उपसचिव सत्यनारायण बजाज यांनी याबाबतचे आदेश प्रसिद्ध करून मुदतवाढ दिली.

राज्यात नागरिकांनी कमी भरलेले मुद्रांक शुल्क भरण्यासाठी दंडाची तरतूद आहे. मात्र, सन १९८० ते २०२० या कालावधीत सुमारे दोन लाख ३४ हजार प्रकरणांत मुद्रांक शुल्क कमी भरल्याचे महालेखाकार कार्यालय आणि नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या तपासणीत समोर आले. मात्र, या मुद्रांक शुल्काची वसुली झालेली नाही किंवा होत नव्हती. त्यामुळे याबाबत अभय योजना राबविण्याचा प्रस्ताव नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने जुलै महिन्यात राज्य सरकारकडे दिला होता. त्यानुसार राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अभय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ही योजना १ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशी दोन टप्प्यांत राबविण्याचे नियोजन होते. आता पहिला टप्पा २९ फेब्रुवारीपर्यंत, तर दुसरा टप्पा १ मार्च ते ३१ मार्च २०२४ या काळात असणार आहे.

# १६ व्या वित्त आयोगात चार सदस्यांची नियुक्ती

**नवी दिल्ली :** सरकारने अर्थ खात्यातील माजी सचिव अजय नारायण झा आणि एसबीआय समूहाचे मुख्य आर्थिक सल्लागार सौम्या कांती घोष आणि इतर दोन सदस्यांची नव्याने स्थापन केलेल्या १६ व्या वित्त आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. निती आयोगाचे माजी उपाध्यक्ष अरविंद पंगारिया यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगात ४ सदस्य असतील, ज्यांना सचिव रित्विक रंजनम पांडे, दोन सहसचिव आणि एक आर्थिक सल्लागार मदत करतील.

पूर्वीच्या १५ व्या वित्त आयोगाचे सदस्य असलेल्या झा यांच्याशिवाय, निवृत्त नोकरशहा अ‍ॅनी जॉर्ज मॅथ्यू आणि अर्थ ग्लोबलचे कार्यकारी संचालक निरंजन राजाध्यक्ष यांची १६व्या वित्त आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सौम्या कांती घोष अर्धवेळ सदस्य असतील, असे अर्थ मंत्रालयाने एका अधिसूचनेत म्हटले आहे. आयोगाचे अध्यक्ष आणि इतर सदस्य अनुक्रमे अहवाल सादर करण्याच्या तारखेपर्यंत किंवा ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत पद धारण करतील. सरकारने ३१ डिसेंबर २०२३ रोजी पंगारिया यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. हा आयोग ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राष्ट्रपतींना आपला अहवाल सादर करेल. हा अहवाल १ एप्रिल 2026 पासून पाच वर्षांचा कालावधी असेल.

केंद्र आणि राज्यांमधील कर हस्तांतरण आणि महसूल वाढीचे उपाय सुचवण्याव्यतिरिक्त, आयोग आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत स्थापन केलेल्या निधीच्या संदर्भात आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांना वित्तपुरवठा करण्याच्या सध्याच्या व्यवस्थेचा आढावा घेईल.

यापूर्वीच्या एनके सिंग यांच्या नेतृत्वाखालील १५ व्या वित्त आयोगाने २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीत केंद्राच्या विभाज्य करांमधील ४१ टक्के वाटा राज्यांना देण्याची शिफारस केली होती, जी वाय. व्ही. रेड्डी यांच्या अंतर्गत १४ व्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या समान पातळीवर आहे.

# रिल बनवणाऱ्या पनवेल पालिकेच्या पाच कंत्राटी कर्मचाऱ्यांच निलंबन

**राजेंद्रकुमार शेळके.**

**पुणे :-** ऑन ड्युटी इंस्टाग्राम रिल बनवून महापालिकेची बदनामी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निलंबन करून गुन्हा दाखल करण्याची मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्टीय अध्यक्ष डॉ.मुनीर तांबोळी,राष्टीय कार्याध्यक्ष डॉ श्रेयस ठाकूर यांनी महापालिका आयुक्त यांना पत्राद्वारे मागणी केली होती. पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी तत्काळ दखल घेत पाच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे निलंबन केले आहे.पनवेल तहसील कार्यालयात निवडणूक विभागात डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून महापालिकेचे कमर्चारी काम करत आहेत.पण हे काम कमी आणि इंस्टाग्राम रिअल्स बनवण्यात जास्त व्यस्त असल्याचे व्हिडिओ सोशल मीडिया वर व्हायरल झाले होते. पनवेल महापालिकेचे कंत्राटी कमर्चारी महेंद्र ठाकूर, आश्विनी हजारे, सुनीता नाईक, सुलोचना गडहिरे,अमर नाईक या पाच कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले असून कायमस्वरूपी कमर्चारी म्हणून लिपिक पदावर काम करणारा आकाश केणी याला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करीत कारणे दाखवा नोटीस दिली आहे.महापालिकेचे कमर्चारी हे महापालिकेचे प्रतिनिधी आहेत. त्यांना महापालिकेच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणे गरजेचे आहे.परंतु या कमर्चार्यांनी महापालिकेची बदनामी करून महापालिकेच्या प्रतिष्ठेला धोका निर्माण केला आहे.या कमर्चार्यांवर गुन्हा दाखल करून तात्काळ नोकरीतून काढण्यात यावे त्याऐवजी, होतकरू मुलांना नोकरीत लावावे.अशी मागणी मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्टीय अध्यक्ष डॉ मुनीर तांबोळी, राष्टीय कार्याध्यक्ष डॉ श्रेयस ठाकूर यांनी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे पत्राद्वारे केली होती.आयुक्तांनी या प्रकरणी त्वरित कार्यवाही करून महापालिकेच्या प्रतिष्ठेचे रक्षण केले असल्याचे डॉ.मुनीर तांबोळी यांनी सांगितले.

## कंपनी निकाल

# मारुतीचा तिमाही नफा ३३.२७ टक्के वाढला

**नवी दिल्ली :** मारुती सुझुकी इंडियाच्या ३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत एकत्रित निव्वळ नफ्यात ३३.२७ टक्क्यांनी वाढ करत ३,२०६.८ कोटी रुपयांवर पोहोचला. मारुती सुझुकी इंडिया (एमएसआय) ने बुधवारी नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे की, कंपनीने मागील वर्षीच्या कालावधीत २,४०६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला होता. ऑपरेशनमधून एकूण महसूल १४.५६ टक्क्यांनी वाढून ३३,५१२.८ कोटी रुपये झाला असून मागील वर्षीच्या याच कालावधीत तो २९,२५१.१ कोटी रुपये झाला होता. दरम्यान, डिसेंबर तिमाहीत कंपनीची वाहन विक्री वाढल्याने कंपनीच्या एकत्रित निव्वळ नफ्यात ३३ टक्क्यांनी वाढ झाल्याने मारुती सुझुकी इंडियाचे शेअर्स बुधवारी २ टक्क्यांहून अधिक वाढले आहेत. बीएसईवर कंपनीचा शेअर २.२७ टक्क्यांनी वाढून प्रत्येकी १०,१८३.३० रुपयांवर स्थिरावला. दिवसभरात तो २.८३ टक्क्यांनी वाढून १०,२३९ रुपयांवर




पोहोचला होता. एनएसईवर, तो २.१० टक्क्यांनी वाढून १०,१६१.०५ रुपये प्रति शेअर झाला.

### अदानी विल्मरचा नफा घसरला

खाद्यतेल क्षेत्रातील प्रमुख अदानी विल्मार लिमिटेडचा डिसेंबर तिमाहीत एकत्रित निव्वळ नफा १८ टक्क्यांनी घसरून रु. २००.८९ कोटी झाला आहे. स्वयंपाकाच्या तेलाच्या किमती कमी झाल्यामुळे आणि उत्पन्नात घट झाल्याचे कंपनीने म्हटले आहे. कंपनीचा निव्वळ नफा वर्षभरापूर्वी २४६.१६ कोटी रुपये होता. नियामक फाइलिंगनुसार, या आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत एकूण उत्पन्न १५,५१५.५५ कोटी रुपयांवरून घटून १२,८८७.६० कोटी झाले आहे.

### बँक ऑफ बडोदाचा नफा ४,५७९ कोटी

सरकारी मालकीच्या बँक ऑफ बडोदा (बीओबी) ने बुधवारी डिसेंबर २०२३ ला संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत नफ्यात १९ टक्क्यांनी वाढ करून ४,५७९ कोटी रुपये मिळवला. एका वर्षापूर्वी याच तिमाहीत बँकेने ३,८५३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला होता. मागील वर्षीच्या याच कालावधीत रु. २७,०९२ कोटींवरून एकूण उत्पन्न वाढून ३१,४१६ कोटी रुपये झाले आहे, असे बीओबीने नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे. बँकेचे व्याज उत्पन्न मागील आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत २३,५४० कोटींवरून २८,६०५ कोटी रुपये झाले. डिसेंबर २०२३ अखेर बँकेची एकूण नॉन-परफॉर्मिंग अ‍ॅसेट्स (एनपीए) एका वर्षापूर्वी ४.५३ टक्क्यांवरून ३.०८ टक्क्यांपर्यंत घसरले.

### ऑलेक्ट्राच्या महसुलात ३३ टक्के वाढ

मुंबई : आघाडीची इलेक्ट्रिक बस आणि ट्रकच्या उत्पादक कंपनी ऑलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेड (ओजीएल)ने ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या तिसऱ्या आणि आतापर्यंतच्या नऊ महिन्यांचे एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. ऑलेक्ट्रा ग्रीनटेक लि.चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. प्रदीप म्हणाले, आर्थिक वर्ष २३-२४ च्या तिसऱ्या तिमाहीसाठी महसूल ३३ टक्के वाढून ३४२.१४ कोटी रुपये झाला. वित्तीय वर्ष २३-२४ च्या तिसऱ्या तिमाहीत रु. २७.११ कोटींचा निव्वळ नफा मिळाला असून मागील तिमाहीच्या तुलनेत ७७ टक्के जास्त नफा झाला आहे. कंपनीने ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी ७.६९ रुपये प्रति शेअर कमाई नोंदवली, ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या मागील नऊ महिन्यांसाठी ती ४.७० रुपये होती. या तिमाहीत, ऑलेक्ट्राने १७८ इलेक्ट्रिक वाहने वितरित केली. २०२२-२३ मध्ये वितरित केलेल्या १४२ च्या तुलनेत वितरणात वाढ २५ टक्के एवढी झाली. कंपनीने आजपर्यंत १६१५ इलेक्ट्रिक वाहने वितरित केली आहेत. ८,०८८ एवढी एकूण बस ऑर्डर्स कंपनीकडे आजमीतीला आहेत.

# राजे गट आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर

## काय निर्णय घेणार : आ. श्रीमंत रामराजे यांची भूमिका काय असेल ?

**फलटण :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विधान परिषद माजी सभापती आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि.१ फेब्रुवारी रोजी अनंत मंगल कार्यालय, कोळकी (फलटण) येथे राजे गट कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, परंतू सोशल मिडियावर व्हायरल करण्यात आलेल्या या मेळाव्याच्या पोस्टवर पक्षाचे नाव, नेत्यांचे फोटो व अन्य कुणाचेही फोटो अथवा उल्लेख नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये उभी फूट पडल्यानंतर आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी खा. शरद पवार यांची साथ सोडून ना. अजित पवार यांना समर्थन देत त्यांच्या सोबत जाणे पसंत केले होते. कृष्णेच्या पाणी प्रश्नावर अभ्यासू व्यक्तिमत्व अशी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांची ओळख राज्यात आहे. फलटण तालुक्यासह संपूर्ण सातारा जिल्ह्याच्या राजकारणावरही त्यांची मजबुत पकड आहे, परंतू नेतृत्व बदल केल्यानंतर ना. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले, अन्य नेत्याना मंत्रीपदे मिळाली परंतू पक्षाने आ. श्रीमंत रामराजे याना अद्याप कुठलीही जबाबदारी न दिल्याची खंत राजे गट समर्थकांमध्ये आहे, त्यातच उद्याच्या मेळाव्याच्या सोशल मिडियावर व्हायरल झालेल्या पोस्टमध्ये कोणाचाही फोटो, नामोल्लेख नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आ. श्रीमंत रामराजे उद्या काय बोलणार ? कोणता निर्णय घेणार का ?, निर्णय घ्यायला हवाय का ? अशा एक ना अनेक मुद्द्यांवरुन तर्कवितर्क लढविले जात आहेत, चर्चा झडू लागल्या आहेत.

आगामी लोकसभा निवडणुक अनुषंगाने माढा लोकसभा मतदार संघातून आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या बरोबरीने राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) सातारा जिल्हाध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांचेही नाव उमेदवारीसाठी आघाडीवर आहे.

आपला गट, पक्ष मजबुत ठेवायचा असेल तर सत्तेशिवाय पर्याय नाही, त्यातच नीरा - देवघर, धोम - बलकवडी, फलटण - बारामती रेल्वे मार्ग, औद्योगिक वसाहत, रस्ते आदी मुद्द्यांवरुन भाजपाने रान तापविले असल्याने आगामी काळात आपले वर्चस्व अधिक मजबुत करण्याबरोबर विरोधकांचे वाढते प्रस्थ कसे रोखायचे याबाबत रणनीती आखणे, कार्यकर्त्यांची मते जाणून घेणे, सध्या सुरु असलेल्या विविध राजकीय मुद्यांबाबत माहिती देवून चर्चा घडवून आणणे आणि आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समयोचित निर्णय घ्यायचा का ? अशा विविध महत्वपूर्ण मुद्द्यांवर या मेळाव्यात चर्चा होण्याची शक्यता असल्याने त्याकडे अनेकांचे किंबहुना संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी फारसे काही सांगितले नाही.

# मराठा आरक्षणावर शिवजयंतीला भूमिका जाहीर करू : आ.बच्चू कडू




**अहमदनगर :** मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकारने काढलेली अधिसूचना तसेच आंदोलकांवरील दाखल गुन्ह्यांबाबत घेतलेल्या भूमिकेवर शिवजयंतीला भूमिका जाहीर करणार असल्याचे प्रहारचे जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदारबच्चू कडूयांनी सांगितले.दिव्यांग भवनाच्या लोकार्पणासाठीबच्चू कडूहे सोमवारी येथे आले होते. त्यानंतर पत्रकार परिषदेत बच्चू कडू बोलत होते. जिल्हाध्यक्ष अभिजीत पोटे, विधानसभा प्रमुख अप्पासाहेब ढुस, नवाज शेख, लक्ष्मण खडके, सोमनाथ गर्जे यावेळी उपस्थित होते.

बच्चू कडू म्हणाले, सध्या मंदिर मशिदीच्या राजकारणामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न मागे पडले आहेत. सत्ताधाऱ्यांना केवळ धार्मिक आणि भावनेच्या मुद्द्यावर सत्ता गाजवण्यात रस आहे. शेतकऱ्यांशी त्यांना काहीही देणे घेणे नाही. यापूर्वीच्या कॉंग्रेस तसेच आताच्या भाजप सरकारमध्ये कोणताही धोरणात्मक फरक दिसत नाही. केवळ धार्मिक प्रश्नावर त्यांच्यामध्ये काहीसा फरक आहे. शेतकरी, कामगार व मजूरही धार्मिक मुद्द्यावर प्रभावित होत आहेत. पोटाच्या प्रश्नावर लढण्याची तीव्रता त्यांच्यामध्ये कमी झाली आहे. गरीब व श्रीमंतांमध्ये मोठी दरी पडल्याचे निराशाजनक चित्र आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

# सोलापूर महापालिका नोकर भरतीसाठी १५ ते १७ फेब्रुवारी होणार लेखी परीक्षा

## प्रशासनाचे आवाहन

**सोलापूर :** महापालिकेतील ३०२ पदांच्या भरतीसाठी १८ जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर १५ ते १७ फेब्रुवारी असे तीन दिवस ऑनलाइन लेखी परीक्षा होणार आहे. उमेदवारांनी महापालिकेच्या वेबसाईवरुन परीक्षा प्रवेशपत्र (हॉल तिकिट) घ्यावे, असे आवाहन सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांनी सोमवारी केले. महापालिका टीसीएस कंपनीच्या माध्यमातून नोकर भरतीची प्रकिया राबवित आहे. विविध संवर्गातील ३०२ पदांच्या भरतीसाठी ३१ डिसेंबर २०२३ अखेर अर्ज मागविले होते. राज्यभरातून एकूण २३ हजार ४३० अर्ज प्राप्त झाले. लेखी परीक्षेचे केंद्र निवडण्यासाठी उमेदवारांना तीन पर्याय देण्यात आले होते. पात्र उमेदवारांची छाननी सुरू आहे. उमेदवारांना एसएमएस अथवा ईमेलव्दारे परीक्षेबाबतची माहिती दिली जात आहे. महापालिकेच्या www. solapurcorporation. gov.in या संकेतस्थळावर recruitment notice मध्ये परीक्षा प्रवेशपत्र उपलब्ध होणार आहे. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे. प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्राची माहिती, वेळेचा उल्लेख असेल.



उमेदवारांना काही शंका आल्यास टीसीएस कंपनीने दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर संपर्क करावा. प्रवेशपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही, असेही सहायक आयुक्त भोसले यांनी सांगितले.

तर पोलिसांकडे तक्रार करामहापालिकेची भरती प्रक्रिया ऑनलाइन आहे. नोकरी लावून देतो म्हणून कोणी पैशाची अथवा वस्तूची मागणी करीत असेल तर मनपा आयुक्त, पोलिसांकडे तक्रार करावी, असे आवाहन भोसले यांनी केले. ही माहिती देण्यास विलंबतलाठी भरती प्रक्रियेबद्दल लोक अजूनही शंका व्यक्त करीत आहेत. महापालिकेत एकूण ३०२ पदांची भरती सुरू आहे. कोणत्या पदासाठी किती अर्ज आले, किती उमेदवार पात्र राहिले याची माहिती टीसीसीएस कंपनीकडून अद्याप पालिकेला देण्यात आलेली नाही, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# ‘त्या’ जमिनीबाबत तत्काळ निर्णय घ्या

## राजू शेट्टी यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

**जयसिंगपूर :** राज्यातील जमिनीचे शर्तभंग झालेल्या प्रस्तावास मंत्रालय स्तरावरून मान्यता देण्याबाबतचा निर्णय महसूल विभागाकडून घेण्यात आलेला आहे. याआधी शर्तभंग ... ‘त्या’ जमिनीबाबत तत्काळ निर्णय घ्या; राजू शेट्टी यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणीजयसिंगपूर : राज्यातील जमिनीचे शर्तभंग झालेल्या प्रस्तावास मंत्रालय स्तरावरून मान्यता देण्याबाबतचा निर्णय महसूल विभागाकडून घेण्यात आलेला आहे. याआधी शर्तभंग झालेल्या प्रकरणांना जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून मान्यता देण्यात येत होती. यामुळे जमीन शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी स्तरावर मान्यता देण्याबाबतचा निर्णय तातडीने करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापकराजू शेट्टीयांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्रीअजित पवारव महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.

वास्तविक पाहता, शर्तभंग होणारी प्रकरणे शेतकरी व सामान्य कुटुंबांतील प्लॉटधारकांची आहेत. याआधी या प्रकरणांना जिल्हाधिकारी स्तरावरून मान्यता दिल्याने शेतकरी व सामान्य लोकांना पाठपुरावा करणे सहज शक्य होते. ही प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंत्रालयात मान्यतेसाठी सादर करावी लागल्याने शेतकरी व सामान्य लोकांना पाठपुरावा करणे अडचणीचे होऊ लागले आहेत. मुळातच महसूल यंत्रणेकडील कामांची पद्धत पाहिल्यास प्रकरणांचा पाठपुरावा करून मेटाकुटीस येऊ लागले आहेत. ज्या सामान्य लोकांना जिल्हाधिकारी कार्यालय, प्रांत कार्यालय व तहसीलदार कार्यालयातील कामांची माहिती नसते, त्या लोकांना मंत्रालयात येऊन हेलपाटे मारून प्रस्ताव मंजूर करून घेणे म्हणजे मोठे आवाहन निर्माण झालेले आहे.

एकीकडे शासन कामामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व प्रकरणांचा निपटारा सुलभ होण्यासाठी डिजिटलायझेशन व ऑनलाइन सुविधा देत आहे. मग जी कामे यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयातून मान्यता दिली जायची, ती आता परत मंत्रालयातून



मान्यता देण्याचा शासनाचा यामागचा हेतू काय आहे. आधीच महसूलच्या गलथान व दिरंगाईच्या कारभाराबद्दल सामान्य लोकांच्या मनात चीड निर्माण झालेली असून, लोक यामध्ये भरडले जाऊ लागले आहेत. त्यातच शासनाने अशा पद्धतीने घेतलेल्या नवीन निर्णयामुळे सरकारच्या हेतूबद्दल व संगनमताबद्दल सामान्य जनतेच्या मनात शंका निर्माण झालेली असल्याने राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या भावनांचा आदर करून पूर्वीप्रमाणे जमीन शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी स्तरावर मान्यता देण्याबाबतची मागणी शेट्टी यांनी यावेळी केली.

# जालना, शिर्डी ते मुंबई दक्षिण मध्य, लोकसभेच्या ८ जागांवरुन मविआमध्ये धुसफूस

### ४० जागांवर सहमती

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून जवळपास ४० जागांवर अंतिम निर्णय झाल्याचं सांगण्यात येत आहे. मात्र उरलेल्या ८ जागांवरून तिढा कायम आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित आघाडीच्या समावेशामुळे आता मविआमध्ये तिढा वाढणार की लवकर सुटणार याबाबत चर्चा सुरु आहेत. मंगळवारी ३० जानेवारीला महाविकास आघाडीच्या बैठकीत राज्यातील लोकसभेच्या ४८ पैकी ४० जागांवर कोणता पक्ष निवडणूक लढवणार हे जवळपास फायनल झाल्याचं सांगण्यात आलं आहे. तर उर्वरित ८ जागांचा तिढा अद्याप कायम आहे.

या ८ जागांमध्ये नागपूरमधील रामटेक, हिंगोली, वर्धा, भिवंडी, जालना आणि शिर्डी यांचा समावेश आहे. जिथे शिवसेना ठाकरे गट आणि कॉंग्रेस याच जागांवर दावा करत आहेत. याशिवाय कॉंग्रेस पक्ष मुंबई दक्षिण मध्य मतदारसंघ आणि मुंबई उत्तर पश्चिमच्या जागा मुंबई कॉंग्रेस मागत आहे. सध्या या आठही जागांवर शिवसेना (ठाकरे आणि शिंदे) आणि भाजप यांचे खासदार आहेत.

**तिढा असलेल्या जागी विद्यमान खासदार कोण?**

- रामटेक - कृपाल तुमाणे (शिवसेना शिंदे गट)
- हिंगोली - हेमंत पाटील (शिवसेना शिंदे गट)
- वर्धा - रामदास तडस (भाजप)
- भिवंडी - कपिल पाटील (भाजप)
- जालना - रावसाहेब दानवे (भाजप)
- शिर्डी - सदाशिव लोखंडे (शिवसेना शिंदे गट)
- मुंबई दक्षिण मध्य - राहुल शिवाळे (शिवसेना शिंदे गट)
- मुंबई उत्तर पश्चिम - गजानन कीर्तिकर (शिवसेना शिंदे गट)

उद्धव ठाकरे गटाचा जागा सोडण्यास नकार

मात्र मुंबईतील दोन्ही जागांवर शिवसेना विजयी झाली होती. उद्धव ठाकरे गट दोन्ही जागा सोडण्यास तयार नाही.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २ फेब्रुवारीला होणाऱ्या पुढील बैठकीत हा तिढा सुटला नाही, तर हा मुद्दा तिन्ही पक्षाच्या नेतृत्वासमोर मांडला जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

### मराठवाड्यातील जागावाटप

**मराठवाड्यातील महाविकास आघाडीचं जागावाटप जवळपास पूर्ण झालं आहे.मराठवाड्यातील ८ जागांपैकी सर्वाधिक जागा शिवसेना ठाकरे गटाला मिळणार आहेत. ठाकरे गटाला ४, कॉंग्रेसला ३ तर राष्ट्रवादी शरद पवार गटाला १ जागा देण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. मात्र हिंगोलीच्या जागेवर तिन्ही पक्षांचे दावे असल्याने मविआच्या पुढील बैठकीत याबाबत चर्चा होणार आहे.**

यासोबतच वंचित बहुजन आघाडीच्या मविआमधील समावेशनंतर वंचित बहुजन आघाडीसुद्धा जागा वाटपासंदर्भात आपली भूमिका २ फेब्रुवारीला होणाऱ्या बैठकीत ठेवणार आहे. वंचितसाठी अकोला लोकसभा मतदारसंघाची जागा सोडण्यात आली आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी मविआमध्ये या एकाच जागेवर समाधानी राहणार की आणखी जागांची मागणी करणार हे पाहावं लागेल. वंचित बहुजन आघाडीकडून अधिक जागांची मागणी झाल्यास हा तिढा आणखी वाढू शकतो.

पश्चिम महाराष्ट्रातील जागावाटप

राज्यात महाविकास आघाडीचे जागा वाटप जवळपास ठरले आहे. आधी मराठवाड्यातील जागावाटप निश्चित झाल्यानंतर आता पश्चिम महाराष्ट्रातील जागावाटपावर सहमती झाल्याचं सांगण्यात येत आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर आदी जिल्ह्यातील १० लोकसभा जागा वाटप निश्चित झाले आहे. यामध्ये शिवसेना ठाकरे गट दोन, कॉंग्रेस तीन आणि चार मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट लढवणार आहे. एक मतदारसंघ मित्रपक्षाला देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. वंचित बहुजन आघाडीचा समावेश झाल्याने त्यांना कोणत्या जागा सुटणार, याकडेही लक्ष





‘उज्वल उद्यासाठी’ या विशेष शैक्षणिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना चाटे समुहाचे संचालक प्रा. डॉ. भारत खराटे व समोर उपस्थित विद्यार्थी व पालक.

# आठवी ते दहावी हा स्पर्धा परीक्षांचा पाया : प्रा.डॉ.भारत खराटे

**कोल्हापूर :** चाटे शिक्षण समूह, कोल्हापूर विभाग यांच्या विद्यार्थी विकास प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाची ओळख व्हावी आणि भविष्यातील संधीची जाणीव करून द्यावी म्हणून उज्वल भवितव्यासाठी स्पर्धापरीक्षांची तयारी हा विशेष शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम समुहाकडून आयोजित केला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते चाटे शिक्षण समुहाचे संचालक प्रा. डॉ. भारत खराटे यांनी उज्वल भवितव्यासाठी स्पर्धा परीक्षामधील यश अत्यंत महत्वाचे असून हे यश मिळविण्यासाठी तुमच्या ज्ञानाचा पाया भक्कम असला पाहिजे. हा पाया पक्का करण्यासाठी आठवी ते दहावीमध्ये शालेय अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांच्या दृष्टिने अभ्यास करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. नवीन शैक्षणिक प्रवाह विचारात घेवून चाटे समुहाने आठवी ते दहावीतील स्पर्धापरीक्षा तयारीसाठी इंटीग्रेटेड बॅचची कार्यपद्धती वेगळी बनवून अशा महत्वाकांक्षी विद्यार्थ्यांना अधिक प्रगल्भ बनवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आठवी ते दहावीमधील अभ्यासक्रमात स्पर्धापरीक्षेला दिलेले महत्त्व, स्पर्धापरीक्षेसाठी अपेक्षित असलेली वेगळी विचारसरणी, शालेय पातळीवर असताना स्पर्धेसाठीचा पाया कसा भक्कम करावा आणि ज्ञान मिळवताना परीक्षेचा नव्हे तर ज्ञानसंकलनाचा विचार करावा असे आपल्या मार्गदर्शनामध्ये सांगितले.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या कक्षा रूंदावण्यासाठी स्पर्धा परीक्षेतील सहभाग महत्वाचा आहे. यासाठी चाटे शिक्षण समुहाने नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करून चाटे पॅटर्नमध्ये आवश्यक ते बदल केले आहेत. यानुसारच इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया आणि शैक्षणिक जाणीवजागृती सोबतच विद्यार्थ्यांनी अधिकच्या मार्गदर्शनासाठी चाटे शिक्षण समुहाच्या जवळच्या शाखेवर भेट देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी-पालक व चाटे शिक्षण समुहाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रज्ञा गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सर्जेराव राऊत यांनी केले.

### ईव्हीएम शिवाय भाजप ग्रामपंचायत निवडणुकाही जिंकू शकत नाही - संजय राऊत

**मुंबई :** शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधलाय. मुंबईत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उत्तर प्रदेशमध्ये ३०० ईव्हीएम मशीन एका दुकानात मिळाल्या आहेत, आसाममध्ये एका कारमधून ४०० मशिनी मिळाल्या आहेत. ईव्हीएम बनवणारी सरकारी कंपनीमधील चार डायरेक्टर भाजपचे (ँव्झ) आहेत. ईव्हीएममध्ये लावलेला सिक्रेट कोड देखील त्याच कंपनीत बनतो, या कंपनीतील डायरेक्टर जास्त गुजरातमधून आहेत, असा आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. या देशात भाजप पक्ष निवडणुकीच्या मार्गाने, लोकशाहीच्या मार्गाने कोणत्याही निवडणुका जिंकू शकत नाहीत ईव्हीएम हटी भाजप गयी, ईव्हीएम है तो मोदी है, असा हल्लाबोल यावेळी संजय राऊतांनी केला.

२०२४ मध्ये निवडणुका ज्या पद्धतीने लढवल्या जाण्याची तयारी आहे, त्यात दोन पॅटर्न आणि दोन फॉर्मुले आहेत. एक मनसुख भाई फॉर्मुला जे ईव्हीएमचे डायरेक्टर बनले आणि दुसरा चंदीगड फार्मूला. ’आप’ने आणि कॉंग्रेसने निवडणुका जिंकले आहेत पण भाजप मानायला तयार नाही मतपत्रिकांचं अपहरण केलं गेलं, असाही आरोप संजय राऊतांनी केला.

# १ लाख २००८ ‘क्यूआर कोड’ लावले, सर्वेक्षणामुळे काम थांबले

## कुठे लावले, कुठे सोडल्याने, नागरिकांमध्ये संभ्रम



**अकोला :** शहरात घरोघरी निघणारा ओला व सुका कचरा संकलित करण्यासाठी केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घरोघरी क्यूआर कोड लावण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रातील घरोघरी क्यूआर कोड लावण्याचे काम सुरू आहेत. आतापर्यंत महापालिका प्रशासनाने १ लाख २००८ क्यूआर कोड लावले आहेत. परंतु मराठा आरक्षणासाठीच्या सर्वेक्षणात कर्मचारी, अधिकारी गुंतल्यामुळे क्यूआर कोडचे काम रखडले आहे. तसेच शहरातील अनेक भागांमध्ये कुठे क्यूआर कोड लावले तर कुठे सोडल्याने, नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

ओला व सुका घनकचरा ‘डोअर टू डोअर’ संकलित करण्याच्या दृष्टिकोनातून घरांना ‘क्यूआर कोड’ लावण्यात येत आहेत. गत काही वर्षांपासून शहरात घंटागाडीच्या माध्यमातून घराघरांमधील कचरा संकलित करण्यात येतो. परंतु नागरिक सुका व ओला कचरा वेगवेगळा न करता, एकसोबतच कचरा घंटागाडीत टाकतात. त्यांनी कचऱ्याचे वर्गीकरण करावे आणि स्वच्छ शहर व्हावे. त्यासाठी केंद्र शासनाच्या उपक्रमाच्या माध्यमातून शहरात घरोघरी क्यूआर कोड लावण्याचे काम सुरू आहेत. या कामासाठी महापालिकेचा आरोग्य व स्वच्छता विभाग कामाला लागला आहे.

### सर्वच घरांना क्यूआर कोडचे उद्दिष्ट

**महापालिका प्रशासनाने अकोला शहरातील सर्वच घरांना क्यूआर कोड लावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शहरातील कोणतेही घर यातून सुटणार नाही. हा उपक्रम केंद्र शासनाचा असला तरी, याचा फायदा महापालिका प्रशासनाला होणार आहे. सर्व डाटा महापालिकेकडे जमा होणार असल्याची माहिती महापालिका स्वच्छता विभागाचे प्रमुख प्रशांत राजूरकर यांनी दिली.**

# मराठा-ओबीसी आरक्षणावर प्रतिक्रिया देऊ नका; अजित पवारांकडून आमदारांना सूचना

**मुंबई :** राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. दोन्ही बाजूने आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे आगामी लोकसभा-विधानसभा निवडणुका लक्षात घेता आरक्षणाच्या मुद्यावरून राजकीय पक्षांनी देखील सावध भूमिका घेतली असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, मराठा-ओबीसी आरक्षणावर प्रतिक्रिया देऊ नका अशा सूचनाच उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आपल्या राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवार गटाच्या आमदारांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी बोलतांना अजित पवारांनी या सूचना दिल्या आहेत.

अजित पवार यांच्या देवगिरी निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीत मराठा ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा झाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**मागील काही दिवसांपासून मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण पाहायला मिळत आहे. अशात मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांना अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ उघडपणे विरोध केला आहे. विशेष म्हणजे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊन नयेत यासाठी भुजबळ यांच्याकडून राज्यभरात सभा देखील घेण्यात येत आहे. त्यामुळे मराठा समाजाचा भुजबळ यांना प्रचंड विरोध होतांना पाहायला मिळत आहे. आगामी निवडणुका लक्षात घेता भुजबळांच्या या भूमिकेचा अजित पवार गटाला देखील फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे भुजबळ घेत असलेल्या भुमिकेमुळे अजित पवारांची अडचण वाढली असल्याची देखील चर्चा आहे.**

# बोटकेंद्र पुरस्कृत योजनांच्या अमंलबजावणीत महाराष्ट्र अग्रेसर राहिला पाहिजे

# मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला निर्देश



**मुंबई :** केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र अग्रेसरच असला पाहिजे यासाठी नियोजन करा, प्रधानमंत्री आवास योजनेतून जास्तीत जास्त घरे महाराष्ट्रात झाली पाहिजेत, यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर राहीला पाहिजे यासाठी काटेकोरपणे नियोजन करा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिले.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (नागरी), आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, तसेच भारत नेट - महानेट प्रकल्प यांचा आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीत आढावा घेतला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांनी आरोग्य विभागाच्या विविध योजनांचाही आढावा घेतला. मुंबई महापालिकेच्या टीबी हॉस्पिटलचा कायापालट करण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

राज्याचे आर्थिक दुर्बल घटक घरांच्या बांधकामांचे उद्दीष्ट पूर्ण व्हावे यासाठी या प्रकल्पांना गती द्या. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी या केंद्र पुरस्कृत योजनांचा सातत्याने आढावा घेत असतात. गृहनिर्माण आणि नगरविकास विभाग यांनी विविध विभागांशी, स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून अमंलबजावणी गती द्यावी. भविष्यात नवी योजना येणार असेल, तर त्यासाठी आतापासूनच प्रकल्प स्थळ निश्चितकडे लक्ष देण्याची गरज आहे, हे सर्व यंत्रणांना अवगत करा. यात कुठलीही हयगय चालणार नाही, याबाबत त्यांना अवगत करा.

विशेषत: गिरणी कामकामगारांच्या घरकुलांच्या प्रकल्पांनाही गती देण्यात यावी. यातून या वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पांच्या अमंलबजावणीवरही लक्ष देण्यात यावे, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

यावेळी गृहनिर्माण विभागाच्या वतीने राज्यात जुलै २०२२ ते जानेवारी २०२४ या कालावधीत रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यास गती देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. यात ३६ टक्क्यांनी वाढ होऊन उद्दीष्टपुर्ती ४ लाख ५ हजार ११७ घरे म्हणजेच ७२.५१ टक्क्यांवर पोहचल्याची माहिती देण्यात आली.

ते म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी जाता यावे यासाठी आपण मोफत एस.टी.बस सुविधा सुरु केली आहे. त्यामुळे त्यांना उपचारासाठी पुन्हा शासकीय रुग्णालयांमध्ये रांगेत उभे राहावे लागू नये अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

ज्येष्ठांसाठीच्या विविध योजना ज्यामध्ये कर्ण-श्रवण यंत्रे, चष्मे, आधाराची काठी यांबाबतही सुरळीत अमंलबजावणी व्हावी. मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दीष्टही वाढवण्यात यावे. कुष्ठरोगांचे उच्चाटन व्हावे, तसेच लवकर निदान झाल्यास, चांगले उपचार करता येतात म्हणून सर्वेक्षण सुरुच ठेवावे.

मुंबई महापालिकेच्या क्षय रोग (टिबी) रुग्णालयाचा कायापालट करा

बैठकीतूनच मुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई महापालिकेच्या आरोग्या विभागाला टीबी हॉस्पिटलच्या सेवेत सुधारणा आणि तेथील सुविधांचे अद्ययावतीकरण याबाबत दूरध्वनीवरून निर्देश दिले. या रुग्लायातील खाटांची संख्या वाढवण्यात यावी. वॉर्ड वाढवण्यात यावेत. तेथील सेवा-सुविधा दर्जेदार असाव्यात याकडे लक्ष पुरवण्यात यावे. रुग्णालयातील डागडुजी, रंगरंगोटी अशा अनुषांगिक बाबीही वेळेवर पूर्ण व्हाव्यात. त्यासाठी आवश्यकता भासल्यास नवीन डीपीआर देखील तयार करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.

राज्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून आतापर्यत ३५ लाख ३५ हजार ९१२ रुग्णांना लाभ देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यासाठीच्या विमा सुरक्षा योजनेतून शंभर टक्क्यांहून अधिक दाव्यांच्या रक्कमेची प्रतिपुर्ती मिळवण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावर्षी ८३९ कोटी ८१ लाख रुपयांची विमा प्रतिपुर्ती झाली आहे.

आगामी काळातील युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज या योजनेतून राज्यातील २ कोटी ७२ लाख कुटुंबांना म्हणजेच सर्वच लोकसंख्येला प्रति कुटुंब पाच लाख रुपयांची वैद्यकीय विमा सुरक्षा मिळणार आहे. यातून उपचारांच्या प्रकारांची संख्याही वाढणार आहे. तर याअंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांची संख्याही हजार वरून १ हजार ९०० वर पोहचणार असल्याची माहिती देण्यात आली.

भारत नेट -२ (महानेट -१) प्रकल्पाचे ९६ टक्के काम पूर्ण

भारत नेट -२ अंतर्गत महानेट – १ चे ९६ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. ऑप्टिकल फायबर केबलचे जाळे टाकण्याचे काम ९६ टक्क्यांपर्यत झाले आहे. यातून १४० तालुक्यांना तसेच राज्यातील ९ हजार १४६ ग्रामपंचायती महानेटशी जोडल्या गेल्या आहेत.

### महाराष्ट्र घरकुल संख्येत देशात अव्वल रहावा

**घरकूल योजनांच्या नागरी क्षेत्रातील संख्या वाढावी. लाभार्थ्यांनी या योजनांमध्ये सहभागी व्हावे यासाठी घरकुल प्रकल्प स्थळे सर्व नागरी सुविधांनी परिपूर्ण असायला हवेत, याकडे लक्ष देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले. प्रकल्प स्थळ निश्चित करताना, त्या भागात रस्ते, वीज, पाणी या सुविधा देण्याची पुर्वतयारी करा. तसेच प्रकल्प स्थळ निवडताना त्यामध्ये अन्य कुठलेही अडसर असता कामा नयेत, याची खात्री करा.**

### आरोग्य विभागाने ज्येष्ठांसाठी विशेष सुविधा पुरवाव्यात

**आरोग्य विभागाने ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र खिडकी योजना सुरु करावी. त्यांना उपचारासाठी रांगेत उभे राहावे लागू नये, तिष्ठत राहावे लागू नये अशी व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. सीमावर्ती भागातील ८६२ गावात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ देण्याबाबतही ठोस पावले उचलण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.**



**कोल्हापूर येथे आदर्श ग्रंथपाल कार्यकर्ता पुरस्कार स्वीकारताना अ.शा. दानवाडे गुरुजी**

## अ.शा. दानवाडे गुरुजी यांना आदर्श कार्यकर्ता पुरस्कार प्रदान

**कुरुंदवाड /कोल्हापूर :** जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने देण्यात येणारा आदर्श कार्यकर्ता पुरस्कार येथील शतकोत्तर नगर वाचनालयाचे कार्यवाह अ.शा. दानवाडे गुरुजी यांना वारणा उद्योग समूहाचे अध्यक्ष आम. डॉ. विनयरावजी कोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते कुरुंदवाड येथील शतकोतर नगर वाचनालयाचे कार्यवाहक अशा दानवाडे गुरुजी यांना आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार वारणा उद्योग समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनयरावजी कोरे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष, डॉ. गजानन कोटेवार, दलित मित्र डॉ. अशोकराव माने, विजयराव कोलते, सोपानराव पवार, डॉ. सुशांत मगदूम, हिंदुराव तेली, दत्ता देशपांडे, हिंदुराव पाटील, माणिक दातार, सच्चिदानंद आवटी या मान्यवरासह ग्रंथालय क्षेत्रातील कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय कृषी उद्योजिका सौ कल्पना माळी इन्स्पायर आयडॉल पुरस्काराने सन्मानित

**शिरोळ :** येथील राष्ट्रीय कृषी उद्योजिका सौ कल्पना प्रवीण माळी यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याची दखल घेत भास्कर पब्लिकेशन न्यूज नेटवर्क यांच्यावतीने इन्स्पायर आयडॉल तथा प्रेरणा मूर्ती पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले या पुरस्काराबद्दल सौ माळी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

शिरोळच्या स्नुषा सौ. कल्पना प्रविण माळी या गेली सहा वर्ष शेतीविषयक लागणारी उत्पादने तयार करणे व विक्री करणे या विषयी काम करतात. त्यांचे शिक्षण चडल (वनस्पती शास्त्र) व झत्रछ्ळ्हच् या विषयात झाले असून त्या ओयासिस अँग्रो इंडस्ट्रीज या नावाने कृषी क्षेत्रात कार्यरत असणारी संस्था चालवितात. त्यांच्या संस्थेमध्ये शेतातील माती परीक्षण प्रयोगशाळा मित्र किडींचे



उत्पादन प्रयोगशाळा. चिकट व लाईट सापळे तयार करणे. कामगंध सापळे तयार करणे बायोस्टूमिलंट तयार करणे.जीवाणू खते तयार करणे. जैविक किटकनाशके तयार करणे.विदेशी भाजीपाला करार शेती शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था चालविणे याविषयी काम करून कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांनी प्रगती साधावी यासाठी माफक दरात त्यांना सुविधा पुरवितात आतापर्यंत त्यांनी जवळपास २५ ते ३० हजार शेतकऱ्यांना मार्गदर्शन व उत्पादने पुरविले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यातील शेतकऱ्यांना याचा लाभ झालेला आहे.

सौ कल्पना प्रविण माळी यांच्या नावे २ प्रोडक्टच्या पेटंट रजिस्ट्रेशनचे काम सध्या सुरू आहे. त्यांच्या प्रयोगशाळेत सध्या ींशींीळलरश्र षरीळपस चा नाविन्यपूर्ण उपक्रम देखील सुरु आहे. सध्या त्या जैवीक व विषमुक्त शेतीचा प्रचार व प्रसार करण्याचे काम करतात. त्याने कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेवून कृषी मंत्रालय भारत सरकार, नाबार्ड व मॅनेज यांच्या वतीने राष्ट्रीय कृषी उद्योजिका २०२१ हा पुरस्कार दिल्ली येथील कार्यक्रमात केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच यावर्षी भास्कर पब्लिकेशन न्यूज नेटवर्क यांनीही सौ कल्पना माळी यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत इन्स्पायर आयडॉल तथा प्रेरणा मूर्ती पुरस्कार देऊन सन्मानित केले

गोवामधील पणजी येथील दीनानाथ मंगेशकर कला अकादमी येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय पर्यटन मंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते पद्मश्री विनायक खेडेकर माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलफ गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत गोव्याचे कला व सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे यांच्या उपस्थितीत सौ कल्पना प्रवीण माळी यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले यावेळी उद्योजक प्रवीण माळी भास्कर पब्लिकेशन न्यूज नेटवर्कचे अध्यक्ष राजीव लोहार त्यांचे सर्व पदाधिकारी मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

उल्लेखनीय कार्यासाठी सौ कल्पना माळी यांना त्यांचे पती प्रवीण माळी दीर उद्योजक सचिन माळी व त्यांच्या पत्नी प्रा सौ माधुरी माळी आई - वडील यांच्यासह माळी परिवाराचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभत आहे.

## अमोल येडगे कोल्हापूरचे नवे जिल्हाधिकारी, राहुल रेखावार यांची पुण्याला बदली



**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक अमाले जगन्नाथ येडगे यांची कोल्हापूरचे नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. तर जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांची येडगे यांच्या जागेवर बदली झाली. बुधवारी सायंकाळी बदलीचा आदेश निघाला.

## मावळ तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाच्या १९ जागांसाठी ९४ अर्ज

**वडगाव मावळ :** मावळ तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाची पंचवार्षिक निवडणुकीची धामधूम सुरू आहे. संघाच्या १९ जागांसाठी तब्बल ९४ उमेदवारी अर्ज आले आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी एम.ए.कुलकर्णी यांनी दिली. २५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार मंगळवारी (दि.३०)उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस होता.आज (दि.३१) दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून, १ ते १५ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी अंतिम मुदत आहे. १६ फेब्रुवारी रोजी चिन्ह वाटप व २५ फेब्रुवारी रोजी मतदान व मतमोजणी प्रक्रिया होणार आहे.

मावळ तालुक्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाची सहकारी संस्था असलेल्या या संस्थेत एकूण १९ जागांसाठी निवडणूक होणार असून, यामध्ये सर्वसाधारण अ वर्ग प्रतिनिधी गटातील ९ जागांसाठी २६उमेदवारी अर्ज,ब वर्ग गटातील २ जागांसाठी ११ अर्ज, क वर्ग गटातील ३ जागांसाठी ३४अर्ज,महिला प्रतिनिधींच्या २ जागांसाठी ८अर्ज,अनु.जाती जमाती १जागेसाठी ५ अर्ज,इतर मागास प्रवर्गच्या१जागेसाठी ८अर्ज व भटक्या विमुक्त जाती१जागेसाठी २अर्ज असे एकूण१९ जागांसाठी ९४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

## नामदार भुजबळ साहेबांनी मराठा नेतृत्व केले तर समाज डोक्यावर घेईल : संजय जाधव



**सातारा :** सर्वसामान्य मराठा समाजातील तरुण मनोज जरांगे- पाटील यांचे नेतृत्व मराठा समाजाचे स्वीकारले आहे. त्यामुळे बहुजन समाजाचे नेते नामदार छगन भुजबळ यांनी मराठा समाजाचे नेतृत्व स्वीकारल्यास हा समाज त्यांना डोक्यावर घेईल .कारण, आपल्याला विषमतेची दरी कमी करायची आहे. असे स्पष्ट प्रतिपादन मराठा अभ्यासक संजय जाधव यांनी केले आहे.

आपल्या भारत देशामध्ये विविधतेने नटलेली परंपरा आहे. या परंपरेला छेद देण्याचे यशस्वी झालेले नाही. आणि होणारही नाही. कारण, सध्या सोशल मीडियावर वैचारिक भूमिका मांडण्याऐवजी काहीजण हेतू परस्पर जातीय द्वेष पसरवत आहे. हीच मोठी चिंतेची बाब आहे.

आज खऱ्या अर्थाने मराठा विरुद्ध इतर मागासवर्गीय असा ग्रामीण भागात कुठेही संघर्ष पाहण्यास मिळत नाही. किंबहुना आदरणीय नामदार छगन भुजबळ यांनी इतर मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी घेतलेला निर्णय हा त्यांच्या दृष्टीने स्वागत आहे .परंतु ,पाच ते दहा जाती वगळता इतर मागासवर्गीय मधील साडेतीनशे जाती ह्या निर्धास्त अवस्थेत आहेत. त्यांना त्याचे काही देणे घेणे नाही. असे दिसून आले आहे. तरीसुद्धा मराठा व इतर मागासवर्गीय तसेच दलित आणि अल्पसंख्याक असे सर्व मिळून आपण भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, व्यसनविरुद्ध एकत्र लढा उभारू या. ते गरजेचे आहे. भ्रष्टाचार व व्यसन या गोष्टींमुळे सर्व समाजाचे प्रचंड नुकसान होत आहे. शासकीय पातळीवर एखादा जातीचा अधिकारी असेल आणि त्याच जातीच्या व्यक्तीचे काम असेल तर ते काही काम करण्यासाठी पैसे कमी घेत नाही किंवा दुसऱ्या जातीचा आहे म्हणून जास्त पैसे घेत नाही. ही व्यावहारिक बाजू आहे.

वास्तविक पाहता सर्व समाजातील सधन लोकांना आरक्षण नको तर राजकारणासाठी आरक्षणाच्या चळवळीचे नेतृत्व करायचे आहे. हे त्रिवार सत्य आहे. मराठा समाज हा शोषित आहे. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराला मानणार आहे. त्यामुळेच तर मंडल ऐवजी कुमंडल याचा प्रसार व प्रचार मोठ्या वेगात सुरू आहे. बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजाने महाराष्ट्रात समाज सुधारक गाडगेबाबा, स्वतंत्र सैनिक किसनवीर ,वसंतराव नाईक, शंकराव जगताप, ना.ग.गोरे , रत्नप्पा कुंभार,एस.एम. जोशी, जॉर्ज फर्नांडिस, प्रकाश आंबेडकर, मधु दंडवते, बाळासाहेब ठाकरे, डॉक्टर दत्ता सामंत, डॉक्टर नरेंद्र दाभोळकर, तात्यासाहेब कोरे शाहीर अमर शेख अशा अनेक विचार व व्यक्तींचे तसेच समाजसुधारकांचे विचार आत्मसात केलेले आहेत. त्यामुळे आदरणीय छगन भुजबळ यांचे नेतृत्व स्वीकारलेले आहे .हे नाकारून चालणार नाही . आज इतर मागासवर्गीय समाजातील बहुतांश लोक हे आरक्षण चळवळीपासून स्वतः ला दूर ठेवत आहे. त्यामुळे नामदार भुजबळ यांनी मराठा समाजाचे नेतृत्व स्वीकारून आरक्षण चळवळीपासून एक विधायक चांगला संदेश द्यावा .अशी अपेक्षा आहे.

साबरमती के चंद्र तुने कर दिया कमाल... रघुपति राघव राजाराम अशी घोषणा राष्ट्रपिता महात्मा गांधींनी शंभर वर्षांपूर्वी घेतली होती. आज शंभर वर्षांनंतर जय श्रीराम व आयोध्या चे मंदिर उभारणीनंतर जय श्रीराम हा जयघोष जातीवादी चे स्वरूप प्रकट करतोय काय ? अशी शंका निर्माण होते. पूर्वीच्या काळी समाजाची नाळ असलेली व्यक्ती सर्व समाजाचे नेतृत्व करत होते त्यामुळे सर्व जाती धर्माला न्याय देण्याची भूमिका घेत होते . अलीकडच्या काळामध्ये समाजाशी नाळ नसलेले व्यवसाय म्हणून राजकारणात आलेले काही नेत्यांच्या मुळे सध्याची परिस्थिती दिसून येत आहे. सामाजिक भान ठेवून आरक्षण सर्वांना देणे शक्य आहे पण अलीकडच्या काळात देवधर्म, यात्रा- जत्रा यापेक्षा आरोग्य शिबिर व्यवसाय व्यसनमुक्ती शिबिर गरजेचे आहे. त्याबाबत फारशी जागरूकता कुणी करत नाही. कारण लोकांना धार्मिक बनवून त्यांच्याकडून मत घेण्याची स्पर्धा लागलेली आहे. वास्तविक पाहता महात्मा गांधी सारख्या गुजराती समाजाने क्रांती केली असे स्पष्ट करण्यात आले. या वेळेला अजित निकम अनिल माळी शहाजी गुजर प्राध्यापक वाघ आदी मंडळींची या गोष्टीला संमती असल्याचे अधोरेखित झालेले आहे.

## मराठा सर्वेक्षण: आमची जात दारावरच्या पाटीवर दिसत नाही काय?

**कोल्हापूर :** मराठा आरक्षणासाठीम्हणून खुल्या प्रवर्गातील सर्वांचेच सर्वेक्षण सध्या जिल्ह्यात साडेसात हजार शासकीय कर्मचाऱ्यांकडून सुरू आहे. प्रत्येक खुल्या गटाच्या घरात जाऊन त्यांना १८२ प्रश्न विचारावे लागत आहेत, परंतु त्याची माहिती देतानाही अनेक जण 'उपकार' करत असल्यासारखी माहिती देत असल्याचा अनुभव काहींना येत आहे. 'आमची जात दारावरच्या पाटीवर दिसत नाही काय?' चक्क अशी विचारणा एका शिक्षकाला करण्यात आली आहे. ग्रामीण भागात मात्र परिस्थिती वेगळी आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने सरकार जागे झाले आणि त्यांनी दिलेले वेळापत्रक पूर्ण करताना सरकारची दमछाक सुरू झाली. सरकार कोंडीत सापडले की, ते शासकीय कर्मचाऱ्यांनाच 'खिंडीत' पकडणार. त्यानुसार, जिल्ह्यातील साडेसात हजार जणांना कामाला लावण्यात आले आहे. त्यांना प्रभाग वाटून देण्यात आले आहेत. रोज १५ घरांची माहिती भरण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे, परंतु ही माहिती भरतानाही अनेकांची दमछाक होत आहे.

### कर्मचाऱ्यांना बरे-वाईट अनुभव

कारण खुल्या प्रवर्गातील घरातील सदस्याची माहिती भरताना एका घराला किमान अर्धा तास लागत आहे. ही माहिती घेऊन ती अपलोड करावी लागते. सही स्कॅन करून घ्यावी लागते. उलट आरक्षित जाती, जमातीच्या सदस्यांना फक्त तीनच प्रश्न विचारावे लागत असल्याने हे काम पटदिशी होते, परंतु कर्मचाऱ्यांना असे विविध अनुभव येत आहेत की, सर्वेक्षण करणारेही हैराण झाले आहेत.अशी होते विचारणातुम्ही कशासाठी आला आहात, तुम्हाला हे कुणी करायला सांगितलं आहे?तुमच्या गळ्यातील आय कार्ड खरं कशावरून?फक्त मराठ्यांचं सर्वे क्षण करायचं, असा जीआर आमच्याकडे आहे, तुम्ही आम्हाला माहिती कशाला विचारताय?आमचं 'मराठा' म्हणून नाव घालू नका, कुणबी म्हणून घाला, म्हणजे आम्हाला प्रमाणपत्र मिळेल.आरक्षण असलेले विचारतात की, आमची माहिती कशाला घेताय?अनेक वेळा दारच उघडले जात नाही, घरात मालक नाही, म्हणून सांगितले जाते.झोपमोड कशाला करताय, म्हणून खेकसण्याचेही प्रकार

अनेक महिला कर्मचारी, शिक्षिका या सर्वेक्षणात आहेत, परंतु त्यांना स्वच्छतागृहाची अडचण निर्माण होते. अखेर एखाद्या घरातील रागरंग पाहून, एखादा वयस्कर महिलेला विनंती केली जाते. सकाळची शाळा करून हे सर्वेक्षण करताना शिक्षक फेसाटायला लागले आहेत.पुरुष सर्वेक्षक गल्लीत, महिला उपनगरात

महापालिका आणि पर्यवेक्षकांनी सर्वेक्षकांना प्रभाग देताना अजिबात विचार न केल्यासारखी परिस्थिती आहे. पुरुष शिक्षकांना गल्लीतील, पेठांमधील सर्वेक्षण दिले आहे, तर अनेक महिला या उपनगरामध्ये, नव्या वसाहतींमध्ये सर्वेक्षणासाठी पाठविल्या आहेत.

सर्वेक्षण करताना सगळेच अनुभव वाईट नाहीत. अनेक ठिकाणी चहा घेणार का, म्हणून विचारले जाते. आमच्याच घरात जेवायला बसा, म्हणून विनंती केली जाते. पार्किंगमध्ये डबा खायला कर्मचारी बसणार असतील, तर खुर्च्या दिल्या जातात, असे चांगले अनुभवही सर्वेक्षकांना येत आहेत.

## वंचित बहुजन आघाडीच्या नवीन शाखेचे उद्घाटन

**सातारा :** वारुंजी,ता. कराड याठिकाणी वंचितच्या नवीन शाखेचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले.



**नामफलकाचे जल्लोषात उदघाटन करताना वंचितचे पदाधिकारी व कार्यकर्ते. (छाया-अनिल वीर)**

यावेळी जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण देसाई,महासचिव शरद गाडे, तालुकाध्यक्ष प्रा.दिलीप लोखंडे, अध्यक्षा सौ.अपर्णा वाघमारे व सौ.विनंता लगाडे यांची प्रमुख उपस्थीती होती.सदरच्या कार्यक्रमास प्रशांत थोरवडे, संतोष बोलके, राहूल थोरवडे, राजकुमार लादे, मिलींद कांबळे, साहेबराव लोखंडे , किरण सावंत, भागवत कांबळे, जितेंद्र गोतपागर, राजेंद्र गोखले, नितीन जाधव, दिपकजी कांबळे, भगवान सोनवणे, दिनकर कांबळे, ऋतूराज कांबळे, सौ.तृप्ती शिंदे,सौ.सुवर्णा विटूले,सौ.विध्या वाढते,सौ. सुरेखा वाढते, विजय अडसुळे, अमोल गंगावणे,वारुंजी गावचे सर्व उपासक-उपासीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अशोक सराफ यांना सन २०२३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर




**मुंबई :** महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा सन २०२३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. आज यासंदर्भातील घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रुपये २५ लाख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. अशोक सराफ यांनी नाटक आणि चित्रपटांच्या माध्यमातून केलेल्या कला क्षेत्रातील कामगिरीचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह विविध मान्यवरांनी या पुरस्काराबद्दल अभिनेते अशोक सराफ यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्य शासनाकडून देण्यात येणारा हा सर्वात मोठा पुरस्कार आहे. आरोग्यसेवा, उद्योग, कला, क्रीडा, पत्रकारिता, लोकप्रशासन, विज्ञान आणि समाजसेवा या क्षेत्रांत केलेल्या विशेष योगदानासाठी हा पुरस्कार दिला जातो. या क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव देशात आणि जगभर नेणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यास सन १९९५ पासून सुरुवात झाली. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या नाट्य –चित्रपट क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. आपल्या विनोदी शैलीने त्यांनी अनेक चित्रपटातून रसिकांना खळखळून हसायला लावले. त्याचबरोबर, संवेदनशीलतेने भूमिका साकारताना रसिकांना आपल्या अभिनयाने मंत्रमुग्ध केले. त्यांच्या अभिनयाचे गारुड मराठी चित्रपटरसिकांवर आजही कायम आहे.

अशोक सराफ हे मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी आणि दमदार अभिनेता म्हणून अवघ्या चित्रपटसृष्टीत परिचित आहेत. मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाने त्यांचे वेगळे अस्तित्व निर्माण केले. व्यावसायिक नाटकापासून त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर पांडू हवालदार, राम राम गंगाराम, अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा, एक उनाड दिवस, शुभमंगल सावधान, आई नंबर वन अशा चित्रपटांतून विविधरंगी भूमिका करुन प्रेक्षकांच्या मनात स्वत:चे स्थान निर्माण केले. स्वत:च्या कामाचे क्षेत्र मर्यादित न ठेवता त्यांनी विनोदी, खलनायक तसेच गंभीर पात्रेही पडद्यावर साकार केली आणि त्यातून वेगळी शैली निर्माण केली. त्यांच्या या कारकिर्दीचा गौरव राज्य शासनाने या पुरस्कारासाठी त्यांची निवड करुन केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, डॉ. अनिल काकोडकर, वासुदेव कामत, डॉ. गो. ब. देगलूरकर, डॉ. शशिकला वंजारी, ॲड. उज्वल निकम आणि समितीचे सदस्य सचिव बिभीषण चवरे यांचा समावेश होता.

राज्य शासनाने प्रख्यात लेखक पु. ल. देशपांडे यांना पहिला महाराष्ट्र भूषण पुरस्कार देवून त्यांच्या साहित्य सेवेतील योगदानाबद्दल गौरविले होते. त्यानंतर गानसम्राज्ञी लता मंगेशकर (संगीत), ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावसकर (क्रीडा), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर (विज्ञान), क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर (क्रीडा), पंडीत भीमसेन जोशी (कलासंगीत), सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग व राणी बंग (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे (सामाजिक प्रबोधन), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर (विज्ञान), उद्योगपती रतन टाटा (उद्योग), रा. कृ. पाटील (समाजरप्रबोधन), कवीवर्य मंगेश पाडगावकर (साहित्य), नानासाहेब धर्माधिकारी (समाजप्रबोधन), ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर (मराठी चित्रपट), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर (विज्ञान), ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर (विज्ञान), शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (साहित्य), ज्येष्ठ गायिका आशा भोसले (संगीत) आणि निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी (समाजप्रबोधन) यांना राज्य शासनाने यापूर्वी महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे.

## महत्त्वाचे

### जर्मनीच्या शिष्टमंडळाने हसन मुश्रीफ यांची घेतली भेट

**मुंबई :** जर्मनीच्या शिष्टमंडळाने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची मंत्रालयात भेट घेतली. जर्मनीला मागणीप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रातील विविध कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी सहकार्य करण्यात येणार असल्याचे श्री मुश्रीफ यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील तरुणांना कौशल्य विकासासाठी आणि रोजगार संधींसाठी जर्मनीला पाठवण्याविषयी यावेळी चर्चा झाली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासह जर्मनीच्या शिष्टमंडळाचे अँड्रियास रीफस्टेक, प्रो.डॉ. रोलँड हास हे उपस्थित होते.

युरोपियन देशांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरवण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपायोजनांबाबत विचारविनिमय करण्यासाठी राज्यस्तरीय कृती गट स्थापन करण्यात आले आहे. या कृती गटाचे अध्यक्ष तथा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ जर्मनीला पाठविण्याबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे शिष्टमंडळासह भेट घेतली. बैठकीत मुश्रीफ यांनी राज्यात विविध कौशल्य प्राप्त वैद्यकीय कुशल मनुष्यबळ उपलब्ध असून त्यांना प्रशिक्षण आणि जर्मन भाषेचे प्रशिक्षण देवून निवड पात्र मनुष्यबळ जर्मनीत पाठवण्यात येईल, असे सांगितले.

# विशालदादा पाटील यांच्या आटपाडी तालुका दौऱ्यास मोठा प्रतिसाद



**आटपाडी :** देशातली इंडिया आघाडी आणि राज्यातल्या महाविकास आघाडीचे सांगली लोकसभा मतदार संघातील संभाव्य उमेदवार आणि काँग्रेस आय पक्षाचे राज्याचे नेते विशालदादा पाटील यांचे आज आटपाडी तालुक्यातील अनेक गावात मोठ्या उत्साह आणि उत्स्फूर्त भावनेने स्वागत करण्यात आले .

आज सकाळी १० वाजता विशालदादा पाटील यांचे आटपाडी एस . टी . स्टॅन्ड परिसरात आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत जोरदार स्वागत करण्यात आले .आटपाडी तालुका काँग्रेस आयचे अध्यक्ष डी . एम . पाटील सर, काँग्रेस आयचे खानापूर - आटपाडी विधानसभा मतदार संघाचे युवक अध्यक्ष जयदिप भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिकभाई खाटीक, इंजिनीयर महेशकुमार पाटील, सामाजीक कार्यकर्ते अनिसभाई खाटीक, युवक नेते असिफ उर्फ बाबू खाटीक, अमित ऐवळे राजेंद्र जाधव, काकासाहेब जाधव, धनंजय देशमुख, रियाज शेख, संताजी जाधव, प्रताप जाधव, विक्रमसिंह जाधव, मयुर जाधव इत्यादी अनेक जण उपस्थित होते.गळवेवाडी, मुढेवाडी, निंबवडे, वाक्सेवाडी, पिसेवाडी, पळसखेल, दिघंची, लिंगीवरे, राजेवाडी, काळामळा, पुजारवाडी ( दिघंची ), पांढरेवाडी ( दिघंची ), उंबरगाव, दडसवाडी, विठलापूर, शेरेवाडी, आवळाई या गावच्या दौऱ्यावर आलेल्या विशालदादा पाटील यांना मोठया संख्येने उपस्थित होते.

# छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी लागेल ते सहकार्य करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## शिवप्रतिष्ठांनचे संस्थापक संभाजीराव भिडे (गुरुजी) व अध्यक्ष रावसाहेब देसाई यांना दिले आश्वासन

**शिरोळ :** शिरोळ शहरात ऐतिहासिक असा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने लागेल ते मदत करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजीराव भिडे व राष्ट्रीय अध्यक्ष रावसाहेब देसाई यांना दिले आहे

शिरोळ शहरातील सर्व तरुण मंडळाच्या तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा समिती व ट्रस्टच्या अध्यक्षपदी रावसाहेब देसाई यांची एकमताने, सर्वानुमते निवड केल्यानंतर रावसाहेब देसाई यांनी दिलेला शब्द पाळला आहे.

शिवप्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या मोहिमेच्या प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेल्या समारोप समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी शिरोळमध्ये अश्वारूढ पुतळा उभारणी संदर्भात रावसाहेब देसाई यांनी संभाजीराव भिडे यांच्या समवेत चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिरोळमध्ये अश्वारूढ पुतळा उभा करण्यासाठी जे-जे म्हणून सहकार्य लागेल,

ते-ते करण्यास स्वतः मी व राज्य शासन तयार असल्याचा शब्द दिला आहे. तसेच या संदर्भात शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांना या कामी लक्ष घालण्याची सूचना करत रावसाहेब देसाई यांच्याशी चर्चा करून तात्काळ शिरोळात अश्वारूढ पुतळा बसवण्यासाठी कारवाई करण्याचे शिंदे आणि सांगितले

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वाधोड पुतळा उभारण्या संदर्भात झालेली ही चर्चा ऐतिहासिक शिरोळ व तरुणांसाठी महत्त्वाची ठरली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती ताराराणी यांचा ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या शिरोळमध्ये उभा करण्यात येणाऱ्या अश्वारूढ पुतळ्यासाठी कसलीही अडचण येवून देणार नाही. पुतळा उभारणीसाठी स्वतः लक्ष घालून, लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देणार, यात कुठेही कमी केली जाणार नाही. असे अभिवचन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहे.

पुतळा समितीचे अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत चर्चा करून पुतळा उभारणीचा मार्ग सोयीस्कर व सुखकारक केला आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर पुतळ्या संदर्भातील नियोजनाची संपूर्ण माहिती जनतेसमोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा उभा करण्यासाठी शहरातील तरुण मंडळाच्या तरुणांनी घेतलेला निर्णय घराघरात पोहोचला आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक घराचे छत्रपतींच्या पुतळा उभारणीत योगदान राहणार आहे.शिव प्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष, रावसाहेब देसाई हे वेगवेगळ्या गड किल्ल्यावरील मोहीम, दौड,छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, माता जिजाऊ यांच्यावरील अपारनिष्ठा जोपासत छत्रपतींचे कार्य घराघरात पोहोचवण्यामुळे देसाई यांना मानाचे स्थान आहे. त्यांची हीच ओळख छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणीसाठी उपयुक्त ठरणार आहे

# परमपूज्य सद्गुरु अण्णा महाराजांच्या द्वितीय पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



**शिरोळ :** अब्दुललाट(ता शिरोळ) येथील परमपूज्य सद्गुरु अण्णा महाराज यांच्या द्वितीय पुण्यतिथी उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे येत्या १० फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी श्री गुरुचरित्र पारायण विविध मान्यवरांचे प्रवचन कीर्तन भजन यासह अन्य कार्यक्रम होणार आहेत

परमपूज्य सदगुरुअण्णा महाराज बहुउद्देशीय चॅरिटेबल ट्रस्ट,व सार्वजनिक दत्त जयंती उत्सव मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे श्री दत्त मंदिर या ठिकाणी हा सोहळा होणार असून रविवारी गुरुचरित्र पारायण, एकतारी विणा उभा करणे, कल्लेश्वर भजनी मंडळ, संत रोहिदास भजनी मंडळ, परमात्मा भजनी मंडळ, माऊली भजनी मंडळ, परमपूज्य अण्णा महाराज भजनी मंडळ लाट, तर लक्ष्मी भजनी मंडळ लाटवाडी ,पंत भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे

वेदमूर्ती भेदिक मंडळ राहणार देशिंग यांचा शायरी गायनाचा कार्यक्रम परमपूज्य श्री श्रीधाम महाराज सद्गुरु गणेश्वर अवधूत जी मठ लिंगनूर यांचे प्रवचन तसेच माणिक मलिकवाडे, गुरुनाथ संकपाळ, सुधाकर ठाणेकर यांच्यासह मान्यवरांचे प्रवचन होणार आहे शनिवारी १७ फेब्रुवारी रोजी पहाटे पाच वाजता श्रींच्या समाधीवर रुद्राअभिषेक परमपूज्य सद्गुरु अण्णा महाराजांचे सेवक राजाराम महाराज व श्री महादेव महाराज यांच्यासह साधुसंतांच्या उपस्थितीत होणार असून श्रींच्या समाधीवर पुष्पृष्टी अर्पण करण्यात येणार आहे येलूर येथे सत्यवान गावडे महाराज यांच्या शाहीर, बिरदेव ओंकार मंडळ लाट यांचे धनगरी ओव्याचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे

# चर्मकार स्मशानभूमीत भानामतीच्या प्रकाराने खळबळ

**शिरोळ :** आयडेंटी साईज फोटो,लाल अक्षरांमध्ये नाव, लिंबू,दोरा इतर साहित्य शिरोळच्या चर्मकार स्मशानभूमीत एका पिंपळाच्या झाडाला बांधून अडकवलेले आढळल्याने स्मशानभूमीत पुन्हा भानामतीच्या प्रकाराने शहरात खळबळ उडाली आहे.शिरोळच्या पूर्वेकडील पाच किलोमीटर अंतरावरील एका गावातील आयडेंटिटी फोटो व गावचे नाव असल्याने शहरात उलट सुलट चर्चा रंगली आहे.शिरोळ अर्जुनवाड रोड वरील असणाऱ्या चर्मकार समाज स्मशानभूमी बुधवारी सकाळी एका व्यक्तीचा आयडेंटिजेस फोटो त्यावर नाव, लिंबू दोरा असे सर्व साहित्य बांधून एका पिंपळाच्या झाडाला बांधून ठेवल्याचे पहाटे स्मशानभूमीची स्वच्छता करण्यासाठी आलेल्या नागरिकांना हा प्रकार लक्षात आला.या भानामतीचा प्रकाराने खळबळ उडाली आहे.दरम्यान असाच प्रकार शिरोळ पंचगंगा नदीवरील स्मशानभूमीत काही महिन्या पूर्वी घडला होता.त्यानंतर पुन्हा चर्मकार समाजाच्या स्मशानभूमीत या भानामतीच्या प्रकारामुळे शहरातील नागरिकांच्यातून संताप व्यक्त होत आहे.शिरोळ शहराच्या पूर्व बाजूला असणाऱ्या एका ग्रामीण खेडे गावातील व्यक्तीच्या फोटो ठेऊन हा अघोरी प्रकार करण्यात आला आहे.मात्र हा अघोरी प्रकार का ? व कशासाठी ? शिरोळ स्मशानभूमीतच का केला ? या चर्चेने शहरात तर्कवितर्क लढवले जात आहे.

आशा अघोरी प्रकार करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा व स्मशानभूमी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत जेणेकरून या आघोरी प्रकाराला आळा बसेल अशी मागणी नागरिकातून होत आहे.या भानामतीचा प्रकाराने शिरोळ शहरासह तालुक्यात चर्चा रंगली आहे.

## आष्टे येथे आज जाणाई देवीची यात्रा

**परळी;** सातारा तालुक्यातील आष्टे गावची आज यात्रा संपन्न होत असुन जानाई देवीच्या यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे खास आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध कलाकार भाऊ कदम यांचे करून गेला गाव हे नाटक आज रात्री नऊ वाजता सादर होणार आहे. तसेच आज रात्री बारा वाजता श्रींची मिरवणुकी काढण्यात येणार आहे तसेच शुक्रवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी दुपारी ११ ते ४ माया उंब्रजकर यांचा लोकनाट्य तमाशा सादर होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यांनी केले आहे.

# मुंबईत ग्रंथोत्सवाची पर्वणी २२, २३ फेब्रुवारीला आयोजन



**मुंबई :** राज्यात वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत २२ व २३ फेब्रुवारीला ' मुंबई शहर ग्रंथोत्सव' आयोजित करण्यात येणार आहे. मुंबई शहर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने या ग्रंथोत्सवाचे आयोजन होणार आहे.या ग्रंथोत्सवाच्या पूर्वतयारीबाबत मंगळवारी जिल्हा समन्वय समितीची बैठक दादर येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या कार्यालयात झाली. या बैठकीला जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड, ग्रंथोत्सव समितीच्या अध्यक्ष मंजुषा साळवे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह रवींद्र गावंडे, कार्यवाह उमा नाबर, शिक्षण उपनिरीक्षक रविकिरण बि-हाडे, विजय सावंत, बृहन्मुंबई जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह सुनील कुबल, दिलीप कोरे, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे प्रतिनिधी अशोक मुळे, मनपा शिक्षक ग्रंथालयाच्या ग्रंथपाल साधना कुदळे, पी. पी गायकवाड, संजय गावकर, भगवान परब आदी उपस्थित होते.

या महोत्सवात वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथ दिंडी, चर्चासत्र, परिसंवाद, व्याख्यान, लेखक आपल्या भेटीला असे दर्जेदार, प्रबोधनात्मक, मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच साहित्य जगतातील लेखक, साहित्यिकांच्या ग्रंथसंपदासाठी स्टॉल उभारले जाणार आहेत. यावेळी दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे, अशी माहिती या बैठकीत देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात वाचन संस्कृती जोपासण्याची गरज आहे.

विशेषत: लहान शाळकरी मुला-मुलींमध्ये वाचन संस्कृती रूजवण्याची आवश्यकता आहे. ई-बुक सुविधाही आता उपलब्ध झाली आहे. काळानुरूप बदलले पाहिजे. प्रत्येकाचे वाचन वाढले पाहिजे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सामाजिक संस्थांचे सहकार्य घेऊन लोकसहभाग वाढवावा. ग्रंथोत्सव हा 'लोकोत्सव' व्हावा, अशा सूचना बैठकीत मांडण्यात आल्या.

# अनेक नेत्यांची ईडी चौकशी झाली, पण पॉलिटिकल शो केला नाही

## अनिल पाटलांचा रोहित पवारांना टोला

**मुंबई-** राष्ट्रवादीतील शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची १ फेब्रुवारी रोजी पुन्हा ईडी चौकशी होणार आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसमधील कार्यकर्ते राज्यभरात घंटानाद करण्यात येणार आहे. यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप प्रत्यारोप सुरू आहेत, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री अनिल पाटील यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर टीका केली.

रोहित पवार यांच्या आधी अनेक नेत्यांची ईडी चौकशी झाली. त्यांच्या आधी आमदार प्राजक्त तनपुरे, जयंत पाटील साहेब यांची ईडीने चौकशी केली, पण अनेक नेत्यांनी पॉलिटिकल शो केले नाही, असा टोलाही मंत्री अनिल पाटील यांनी रोहित पवार यांना लगावला. 'आपलं कतृत्व चांगल असेल तर ईडीमध्ये काहीही होणार नाही. शो करण्यापेक्षा आपलं म्हणण योग्य पद्धतीने मांडलं तर कोणताच पक्ष काहीही करणार नाही, असंही मंत्री पाटील म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची १ फेब्रुवारी रोजी ईडी कडून पुन्हा चौकशी करण्यात येणार आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून केंद्र सरकार विरोधात महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय आणि तहसील कार्यालय या ठिकाणी केंद्र सरकार विरोधात घंटानाद करण्यात येणार आहे. मागील चौकशीत ईडीनं १० तास रोहित पवारांना बसवून ठेवले. त्यानंतर आता पुन्हा १ फेब्रुवारीला चौकशी होत आहे. त्यामुळे रोहित पवारांची चौकशी पूर्ण होईपर्यंत अन्नत्याग आणि घंटानाद आंदोलन करण्यात येणार अशी माहिती पक्षाच्या प्रवक्त्या माजी आमदार विद्या चव्हाण यांनी दिली आहे. विद्या चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेत म्हटलं की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मुंबई पोलिसांकडून नोटीस पाठवण्यात आली आहे.

# आता पांढरे रेशनकार्डधारकांनाही मिळणार 'आयुष्मान कार्ड'

## ओमप्रकाश शेटे यांनी दिली माहिती

**सांगली :** केशरी, पिवळे रेशनकार्डधारकांनाआयुष्मान भारतयोजनेच्या कार्डचा लाभ मिळत आहे. आता पांढरे रेशन कार्ड असणाऱ्यांनाहीआरोग्ययोजनेचे आयुष्मान कार्ड काढता येणार आहे. या योजनेतसांगलीजिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये ८९.४३ टक्के तर महापालिका क्षेत्रात ७२.५७ टक्के नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढले आहे. शहरापेक्षा ग्रामीण भागातील नागरिक जागरूक असल्याचे दिसत आहे, अशी माहिती आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी आढावा बैठक झाली. या बैठकीनंतर डॉ. शेटे पत्रकारांशी बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त सुनील पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.ते म्हणाले, केंद्र सरकारकडून 'आयुष्मान भारतप्रधानमंत्री जनआरोग्ययोजना' राबविली जात आहे. या योजनेतून लाभार्थ्याला पाच लाखापर्यंतचे मोफत उपचार दिले जातात. योजनेचा केसरी, पिवळ्या रेशनकार्डधारकांबरोबरच आता पांढरे रेशनकार्ड असणाऱ्यांनाही लाभ मिळणार आहे. यामध्ये शासकीय नोकरदार असले तरीही ते आयुष्मान कार्डच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत मोफत उपचार घेऊ शकतात.

आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्यांनी लाभ घ्यायचा काही नाही ते त्यांनी ठरवायचे आहे.

या योजनेत सांगली जिल्ह्यानेही आघाडी घेतली असून ८९.४३ टक्के नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढले आहे. शहरातील नागरिकांकडे सर्व सुविधा असतांनाही आयुष्मान कार्ड काढण्याकडे त्यांचे दुर्लक्ष आहे. यामध्ये महापालिका आयुक्तांनी लक्ष घालून १०० टक्के आयुष्मान कार्ड झाले पाहिजेत, याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे डॉ. शेटे यांनी सांगितले.राज्यात १३५० रुग्णालये

महाराष्ट्रात एक हजार ३५० रुग्णालयांमध्ये आयुष्मान कार्डधारकांना १०० टक्के मोफत उपचार मिळणार आहेत. काही रुग्णालयांच्या अडचणी



असून त्यांना देण्यात येणाऱ्या पॅकेजची रक्कम पाच वर्षांत वाढविली नाही. यामध्ये वाढ करण्यासह योजनेचा अभ्यास करण्यासाठी १०२ डॉक्टरांचे राज्यात समिती गठीत केली आहे. समिती सखोल अभ्यास करून योजनेतील त्रुटी दूर करणार आहे, असेही डॉ. शेटे म्हणाले.'सिव्हील'ची तपासणी करणार

सांगलीतील वसंतदादा शासकीय रुग्णालयाचा कारभार समाधानकारक नाही. बैठकीलाही जिल्हा अधिष्ठातासह प्रमुख डॉक्टर गैरहजर होते. याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करून डॉ. शेटे यांनी 'सिव्हील'ला अचानक भेट देऊन पंचनामा करणार असल्याचे सांगितले.

## पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव



**मुंबई** : पंडीतभीमसेन जोशीयांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत पं.भीमसेन जोशीसंगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या संगीत महोत्सवात भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज गायक-गायिका एक प्रकारे पंडीतजींना सांगीतिक मानवंदना देणार आहेत. हा तीन दिवसीय महोत्सव रसिकांसाठी विनामूल्य आहे.पं. भीमसेन जोशी यांच्या ४ फेब्रुवारी या जन्मदिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र शासन आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरामध्ये ३, ४ आणि ५ फेब्रुवारीला पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच ३ फेब्रुवारीला संजीवनी भेलांडे, आशिष रानडे, अंकिता जोशी, रवी चारी, रागेश्री वैरागकर यांचे गायन होईल.दुसऱ्या दिवशी रमाकांत गायकवाड, मधुवंती बोरगांवकर, उपेंद्र भट, अभिजीत पोहनकर, सानिया पाटणकर आपल्या सुमधूर गायनाने महोत्सवात रंग भरतील. तीन दिवसीय महोत्सवाची सांगता ५ फेब्रुवारीला यश कोल्हापुरे, मृणालिनी देसाई, चंदल पाथ्रीकर, नंदिनी शंकर, अर्चिता भट्टाचार्य, मंजुषा पाटील यांच्या गायनाने केली जाईल.

# भरजरी साडीवर स्वेटर घातला तर लुक खराब होतो? अशी करा हिवाळ्यातील 'उबदार' फॅशन!



सध्या थंडीचा सीझन आहे आणि समारंभांचाही! समारंभ म्हटला की नेहमीचे फॉर्मल व कॅज्युअल वेअर सोडून फेस्टिव्ह वेअर अथवा फंक्शनल वेअर जास्त वापरले जातात. ह्या सीझनमध्ये महिलांना नेहमीच प्रश्न पडतो तो म्हणजे थंडीत कशी व कुठली फॅशन करायची? समारंभासाठी वापरले जाणारे कपडे भरजरी असतात व त्यावर जर शॉल अथवा स्वेटर घातला तर संपूर्ण लुक खराब होऊ शकतो. मग करायचे काय?

गुलाबी थंडीत गरम कपडे घालायचे की स्टायलिश कपडे हेच समजत नाही. विशेषतः जेव्हा लग्न अथवा पार्टीला जायची वेळ येते तेव्हा तर पंचाईतच होते. समारंभाला ट्रॅडिशनल वेअर आवडीने घातले जातात. ट्रॅडिशनल वेअरमध्येसुद्धा महिलांचा कल साडी नेसण्याकडे अधिक असतो.

साडी हा असा पेहराव आहे, की समारंभ कुठलाही असो; प्रत्येक सणाला व समारंभाला साडी शोभूनच दिसते. साडी म्हणजे एका सदाबहार फॅशनच! पण हिवाळ्याच्या काळात महिलांना साडीची स्टाइल कशी करावी याबद्दल संभ्रम असतोच. कारण साडी नेसल्यावर थंडी वाजू नये व आपण स्टायलिशही दिसावे, असे सर्वच स्त्रियांना वाटते.

कडाक्याच्या गारठ्यात साडी, नको गं बाई! या टिप्स वापरा अन् साडीतही ब्युटी क्विन दिसा

साडी नेसतानाचे काही प्रकार व टीप लक्षात ठेवल्या तर गारठ्यातही फॅशनेबल दिसता येते. हिवाळ्यातल्या समारंभासाठी वेलवेट फॅब्रिक हा सर्वोत्तम पर्याय आहे. वेलवेट फॅब्रिकच्या साड्या वॉर्डरोबमध्ये असाव्यातच. कारण त्या कोणत्याही फंक्शनमध्ये एकदम रॉयल आणि रिच लुक देतात.

वेलवेटचे कापड मुळात उबदार व वजनाला हलके असते. विविध रंगांमधल्या वेलवेटच्या साड्या खरेदीसाठी सर्वत्र उपलब्ध असतात. ह्या कापडाचे वैशिष्ट्य असे, की वेलवेटचे कापड अंगावर चापूनचोपून नीट बसते.

साडी नेसल्यावर तुम्ही फ्री पल्लू म्हणजे पदर ओपन पिन-अप केला, म्हणजेच फक्त काठ पिन-अप करून मोकळा सोडला, तर तो मोकळा सोडलेला पदर तुम्ही दुसऱ्या खांद्याभोवती गुंडाळू शकता व थंडीपासून स्वतःचा बचाव करू शकता.

अनेक प्रकारच्या उबदार साड्यांचे प्रकार या सीझनमध्ये तुम्हाला वापरता येतील. बनारसी साड्या, कांजीवरम साड्या, जामेवार व पटोला ह्या सगळ्या सिल्कमधल्या साड्यांना ऊब असते. कारण ह्या प्रकारच्या साड्यांचा पोत इतर साड्यांपेक्षा थोडा जाड असतो.

पर्यटन

सगळ्यांनाच आवडतं, अगदी तारे-तारकांनासुद्धा!

कलाकार मंडळी शूटिंगच्या निमित्तानं, कार्यक्रमांच्या निमित्तानं, तर कधी नुसतीच एन्जॉयमेंट म्हणून अनेक ठिकाणी हिंडत असतात. त्यांच्याकडून जाणून घेतलं त्यांच्या आवडत्या ठिकाणांबद्दल...

# मराठी कलाकारांनाही पडली परदेशातील या ठिकाणांची भुरळ..!

**रितिका श्रोत्री : ओढ कोकण किनाऱ्याची...**

आपण शहरात राहतो, खूप धावपळीचं आयुष्य जगतो. अर्थात याबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही, कारण मला माझ्या कामापासून कधीच लांब जायचं नसतं.

पण कधीतरी सुट्टी मिळाली, की कोकणातल्या समुद्र किनाऱ्यांवर फिरायला मी नेहमीच तयार असते. कुटुंबासोबत किंवा मग मित्र-मैत्रिणींसोबत मी लगेचच ट्रीप प्लॅन करते.

मी लंडन आणि दुबईला फिरायला गेले होते, परंतु मला सर्वात जास्त आवडतं ते कोकणाचं सौंदर्य, मग तो कोकणातला कोणताही भाग असो. माझं समुद्रावर विशेष प्रेम आहे. समुद्रावर एक वेगळ्याच प्रकारची शांतता अनुभवता येते.

त्यातही समुद्र किनाऱ्यावर रात्री फिरायला मला फारच आवडतं. कारण रात्रीचं आकाश आणि तारे यांमुळे समुद्र किनारा अधिकच लोभस वाटतो. लाटांचा आवाज मनाला अत्यंत प्रसन्न करतो. त्यामुळे मानसिक शांतता उत्तम अनुभवता येते.

आता एवढ्यातच मी माझ्या मित्र-मैत्रिणींसोबत आंजर्ल्याला गेले होते. मला नेहमीच आधी न पाहिलेली ठिकाणं पाहायला आवडतात; ज्या ठिकाणी खूप जास्त प्रमाणात गर्दी नसते अशा समुद्र किनाऱ्यावर जायला मला आवडतं.

त्यासाठी मग स्थानिकांनाच आम्ही म्हणतो, 'गर्दी नसलेले समुद्र किनारे सुचवा.' मग त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी आम्ही पहाटे आणि रात्री जातो. माझ्या भावाला तर ट्रेकिंगची फारच आवड आहे. त्यामुळे तो अशी न पाहिलेली ठिकाणे शोधून काढतो.

कोकण आवडण्याचं आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे तिथली खाद्य संस्कृती. मला मासे खायला फार आवडतात. मी, बाबा आणि भाऊ असं आमचं त्रिकूट कट्टर मासेप्रेमी आहे.

त्यामुळे कोकणातले रवा फ्राय, वेगवेगळ्या करी, कोळंबी, सुरमई, पापलेट या सगळ्या पदार्थांची चव चाखून त्यांचा आनंद घ्यायला आम्हाला प्रचंड आवडतं. त्यामुळे कोकणाला माझी नेहमीच पहिली पसंती असतो.

**नूपुर दैठणकर: लंडनवारी**

नृत्याच्या कार्यक्रमांमुळे मला अनेक ठिकाणी फिरण्याची संधी मिळाली. या निमित्ताने देश-परदेश मी फिरले आहे. त्या ठिकाणांपैकी जास्त आवडलेलं शहर म्हणजे लंडन. अलीकडेच मी तिसऱ्यांदा लंडन फिरून आले.

काही गोष्टी मला नव्याने उलगडत गेल्या; सेंट्रल लंडनमध्ये फिरता आलं, त्याच्या आजूबाजूची छोटी-छोटी गावंसुद्धा मला फिरता आली. लंडनमधील निसर्ग सौंदर्य मला अनुभवायला मिळालं.

यावेळी मी 'फॉल' सीझनमध्ये तिथे गेले होते त्यामुळे मला निसर्गातील रंगांची फार सुंदर उधळण अनुभवता आली. बर्फवृष्टीचाही आनंद घेतला. लंडनमधील ऐतिहासिक संग्रह मला फार आवडला. ऑक्सफर्ड स्ट्रीट, विविध फॅशन आऊटलेट पाहिली. ओतप्रोत भरलेल्या नैसर्गिक सौंदर्याबरोबरच तेथील लोकांशी संवाद साधणं, सार्वजनिक वाहनानं प्रवास करणं खूप सोपं आहे. अतिशय उत्तम प्रवासाच्या सोयी आहेत, त्यामुळे मला एकटीनं प्रवास करणंही खूप सोपं गेलं.

तिथं आपण कितीही दिवस राहिलो, तरी कंटाळा येत नाही, हे लंडनचं वैशिष्ट्यच म्हणावं लागेल. रोज नवीन ठिकाणं पाहू शकतो, अनुभवू शकतो. अगदी चालत जाण्याच्या अंतरावर विविध सौंदर्यपूर्ण स्थळं आहेत.


लंडनमध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेता आला. जर्मन डोनट, जर्मन कबाब, चीज बॉल हे माझे तिथले आवडते पदार्थ आहे. व्हिएतनामीज रेस्टॉरंटही मला प्रचंड आवडतं. तिथली प्रेटची कॉफी महाराष्ट्रातल्या चहाप्रमाणे सवयीची आहे. तिथे जॅपनीज, चायनीज असे सर्व प्रकारचे पदार्थ खायला मिळतात, तेही अगदी ऑथेंटिक.

लंडनमध्ये सांस्कृतिक विविधता खूप मोठ्या प्रमाणात आहे. इन्फ्रास्ट्रक्चर अप्रतिम, डोळ्यांचं पारणं फेडणारं! नैसर्गिक आणि मानवनिर्मित सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना लंडनमध्ये पाहायला मिळतो. त्यामुळे एकदातरी लंडनला जावंच.



नेहा महाजन :

# हेअर बोटॉक्स ट्रीटमेंट म्हणजे नेमके काय?



केसांच्या कंडिशननुसार कोणती ट्रीटमेंट घ्यावी हे तज्ज्ञांना विचारावे. कुठलीही ट्रीटमेंट करायची असल्यास ती एक्स्पर्टकडूनच करून घ्यावी. त्याआधी त्यांच्याकडून संपूर्ण माहिती घ्यावी, पोस्ट ट्रीटमेंट केअरबद्दल जाणून घ्यावे. हेअर बोटॉक्स प्रोसेसमध्ये हिटिंग टूल वापरत नाहीत, त्यामुळे इतर प्रोसेसपेक्षा हेअर बोटॉक्स आणि हेअर स्पा ह्या हेअर हिलिंग प्रोसेस आहेत.

हेअर बोटॉक्स ट्रीटमेंट म्हणजे नेमके काय असते? स्किन बोटॉक्ससारखेच इंजेक्शन देतात का? देत असतील तर डोक्यामध्ये इंजेक्शन घ्यावे लागेल का? पार्लरमध्ये बरेच वेळा ऐकले आहे, केरटीन ट्रीटमेंट, बोटॉक्स ट्रीटमेंट, स्मूथनिंग, स्पा ट्रीटमेंट आणि बरेच काही.

ही सगळी नावे ऐकून गोंधळल्यासारखे होते. ह्या सगळ्याची खरेच गरज असते का? त्यात हल्ली बऱ्याच पार्लरमध्ये एक विचारले तर दहा गोष्टी सजेस्ट करतात, अमुक करा, चेहरा तरुण दिसेल; तमुक करा मग केस गळायचे थांबतील आणि असेच बरेच सल्ले दिले जातात.

'बोटॉक्स फॉर हेअर' नेमके काय आहे आणि कोणी करावे ?

आपल्या स्किन आणि हेअर केअरबद्दल जागरूक असणे, कुठलीही ट्रीटमेंट घेण्याआधी त्याबद्दल माहिती करून घेणे आणि विचारपूर्वक निर्णय घेणे, हे खूप महत्त्वाचे आहे. खूप वेळेस आपण पार्लरमध्ये सांगतील ते करून घेतो, पण खरेच ती ट्रीटमेंट आपल्याला आवश्यक आहे का, याकडे आपले दुर्लक्ष होते.

तसेच जी व्यक्ती आपल्याला सल्ला देतीये, ती या क्षेत्रातील कितपत तज्ज्ञ आहे, ह्याबद्दल फार कमी लोक जागरूक असतात. अशा वेळेस 'स्वस्त आणि मस्त' फार महागात पडू शकते, ह्याचा विचार केला जात नाही.

असो, तुम्हाला पडलेला प्रश्न अगदी योग्य आहे, की 'बोटॉक्स' म्हटले की इंजेक्शन डोळ्यासमोर येते. स्किन बोटॉक्स इंजेक्शन 'बोट्यूलिनम टॉक्सिन'चे असते. त्यामुळे त्वचेची लवचिकता वाढून बारीक सुरकुत्या कमी अथवा नाहीशा होतात आणि त्वचा टवटवीत दिसते.

पण हेअर बोटॉक्समध्ये असले काहीही नसते अन् इंजेक्शनदेखील घ्यावे लागत नाही. हेअर बोटॉक्स ही एक टॉपिकल प्रोसेस आहे, म्हणजे केसांवर बाह्यस्वरूपात प्रॉडक्ट लावले जाते. त्यामुळे केसांचे रिजुव्हिनेशन होते, आणि केस चमकदार, हेल्दी आणि सॉफ्ट दिसतात.

ज्यांचे केस फ्रीझी आहेत, डॅमेज झालेले आहेत, स्प्लिट एन्ड खूप आहेत, केस वीक असतील आणि सारखे तुटत असतील, त्यांनी हेअर बोटॉक्स ट्रीटमेंट जरूर करावी. केसांवर वारंवार केमिकल ट्रीटमेंट केली असेल, उदाहरणार्थ, स्ट्रेटनिंग, पर्मिंग किंवा तत्सम हीट ट्रीटमेंट सारखी करून केस डल आणि निर्जीव झाले असतील त्यांनीही ही ट्रीटमेंट घ्यायला हरकत नाही.

बोटॉक्स प्रोसेसमध्ये केसांना भरपूर हायड्रेट केले जाते. जे केस डॅमेज झालेत अथवा तुटलेत, त्या केसांना पोषण देऊन तुटलेल्या हेअर फायबरमध्ये आवश्यक ते फायबर फील केले जाते. त्यामुळे केसांचा व्हॉल्युम छान दिसतो आणि केस चमकदार व स्मूथ दिसतात.

**केस गळण्यामागची 'ही' प्रमुख कारणे तुम्हाला माहित आहेत का?**

ह्या ट्रीटमेंटसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रॉडक्टमध्ये भरपूर प्रोटीन आणि व्हिटॅमिन असतात, ते केसांच्या पोषणासाठी आवश्यक असतात. ही ट्रीटमेंट घेताना केसांना डीप कंडिशनिंग तर होतेच, शिवाय केसांना आवश्यक ते प्रोटीन आणि व्हिटॅमिन मिळून केस हेल्दी दिसतात.

**सातारा :** छत्रपती शिवरायांचे राजघराणे व तमाम शिवभक्तांच्या वतीने देण्यात येणारा पहिला शिवसन्मान पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाहीर करण्यात आला आहे .साताऱ्यात दिनांक १९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे

पुरस्कार वितरणाचा सोहळा साताऱ्यातील सैनिक स्कूलच्या मैदानावर पार पडणार आहे या शाळेच्या परिसराची प्राथमिक पाहणी आज करण्यात आली . खासदार उदयनराजे भोसले जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख ,सातारा पालिका प्रशासक अभिजीत बापट यांनी कार्यक्रमाची तयारी व त्या अनुषंगाने करावयाच्या उपायोजना सुरक्षा आधी बाबींचा आढावा घेतला .तसेच संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देण्यात आला यावेळी सुनील काटकर माजी उपनगराध्यक्ष म्हणून शेंडे काका धुमाळ पंकज चव्हाण विनीत पाटील उपस्थित होते

२०१९ रोजी सातारा लोकसभा पोटनिवडणुकीच्या दरम्यान उदयनराजे यांच्या प्रचारासाठी येथील साताऱ्याच्या सैनिक स्कूलच्या मैदानावर जाहीर सभा झाली होती .

शिवजयंतीच्या मुहुर्तावर येथील मैदानावर हा पुरस्कार सोहळा होणार आहे . त्यामुळे पंतप्रधानाच्या दौऱ्याला राजशिष्टाचार कार्यालयाचा हिरवा कंदिल मिळाल्यावर सातारा शहराला पोलीस छावणीचे स्वरूप येणार आहे



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिवसन्मान पुरस्कार जाहीर

## १९ फेब्रुवारी रोजी साताऱ्यात होणार पुरस्कार वितरण

# ज्वारी आणि नाचणीत 'एवढी' पोषणमूल्य!!

**ज्वारी**

पोषण मूल्ये - प्रथिने - १०.४ टक्के, कर्बोदके - ७२.६ टक्के, स्निग्ध पदार्थ - १.९ टक्के, खनिजे - १.६ टक्के.

ज्वारीमध्ये प्रथिनांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थ, शर्करा आणि खनिजद्रव्ये मुबलक प्रमाणात आढळतात. ज्वारीची भाकरी पचण्यास अतिशय हलकी आणि आरोग्याच्या दृष्टीने अतिशय लाभदायक आहे. जेव्हा शक्य असेल तेव्हा ज्वारीची भाकरी आहारात असावी.

ज्वारीमध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त असल्याने शरीराला पटकन ऊर्जा मिळते. ती ऊर्जा दिवसभर कामी येते. ज्वारीमधील पोषकद्रव्ये पाहता ज्वारीचा आहारात उपयोग केल्याने आहारातील पोषकमूल्यांचे संतुलन योग्य ठेवण्यास मदत होते.

**नाचणी**

पोषणमूल्ये - प्रथिने - ७.३ टक्के, कर्बोदके - ७.२ टक्के, स्निग्ध पदार्थ - १.३ टक्के, खनिजे - २.७ टक्के. नाचणीमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि 'ब' जीवनसत्त्व यांचे प्रमाण जास्त आहे. पोटॅशियम हा पेशीद्रव्यातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

तो पेशीनिर्मितीसाठी, पर्यायाने स्नायूनिर्मिती आणि त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. 'ब' वर्गीय जीवनसत्त्वे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी मदत करतात.

नाचणीयुक्त अन्नपदार्थांचा वापर लहान मुले आणि गरोदर स्त्रियांमध्ये खूपच फायदेशीर आहे. वाढत्या वयाच्या मुलामुलींना पोषणद्रव्यांची गरज जास्त असते. ही गरज नाचणीयुक्त आहाराने भरून काढता येते.

नाचणीमध्ये तंतुमय पदार्थ जास्त असल्याने नाचणीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे. त्यामुळे नाचणी मधुमेही व्यक्तींसाठी खूप उपयोगी आहे. ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणारे पदार्थ रक्तातील साखर वाढू देत नाहीत, त्यामुळे रक्तशर्करेवर नियंत्रण राहते. मधुमेह पीडित तसेच लहान मुलांच्या आहारात बाजरीप्रमाणेच नाचणीचा समावेश करावा, म्हणजे अनेक पोषकतत्त्वे मिळू शकतात. बालके व आजारी व्यक्तींना नाचणीची पेज किंवा सत्त्व दिले जाते. सध्या बाजारात नाचणीचे अनेक मूल्यवर्धित पदार्थ मिळत आहेत.

नाचणी पचायला हलकी असते. उत्तम अग्निदीपन घडून येते. आजारातून बरे झालेल्या व्यक्तींना नाचणी खायला देणे फायदेशीर आहे, यामुळे शरीराची झालेली हानी भरून निघते. नाचणीपासून तयार केलेले पदार्थ लहान मुलांसाठी शक्तिवर्धक आहेत.

# सलमान खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये होतेय 'फेक कास्टिंग'?

बॉलीवूडचा भाईजान सलमान खान हा नेहमीच त्याच्या वेगवेगळ्या स्टाईल आणि वक्तव्यांसाठी ओळखला जाणारा सेलिब्रेटी आहे. आगामी काळात भाईजानचे वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या सगळ्यात सलमानची प्रॉडक्शन कंपनी चर्चेत आली आहे. त्या कंपनीला काही महत्वाचे खुलासे करावे लागले आहेत.

सलमान खानच्या प्रॉडक्शन कंपनीनं ट्विट करत आपल्या कंपनीविषयी जे काही वेगवेगळ्या प्रकारच्या अफवा व्हायरल होत आहे त्यावर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, आमच्या कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे कास्टिंग केले जात नाही. त्यामुळे आमचे नाव घेऊन जर तुमच्याकडे कोणते मेल्स किंवा फोन आले आणि त्याचा विषय जर कास्टिंगच्या संदर्भात असेल तर त्याला उत्तर देऊ नका.

याशिवाय टीमनं असे देखील म्हटले आहे की, जर सलमान खानचे नाव घेऊन कुणी कोणत्याही प्रकारची बदनामी करत असेल तर त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सलमानच्या प्रॉडक्शन हाऊसच्या वतीनं बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींना ऑडिशन, कास्टिंगचे फेक मेसेज गेल्याचे दिसून आले आहे. यामुळे वेगळ्याच चर्चेला उधाण आल्यानं कंपनीला खुलासा करावा लागला आहे.

प्रॉडक्शन हाऊसकडून कोणत्याही प्रकारे कास्टिंग केले जात नाही. त्यामुळे कुणीही त्यावरील बातम्या, मेसेज यावर विश्वास ठेवू नये. ज्यांनी कुणी हे फेक मेसेज व्हायरल केले आहेत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्या पोस्टमधून सांगण्यात आले आहे. यापूर्वी देखील सलमानच्या कंपनीला अशा प्रकारच्या परिस्थितीचा सामना करावा लागला होता.